

# जुळून येती...

चंद्रकांत शिंदे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# जुळून येती...

(कथासंग्रह)

लेखक : चंद्रकांत नारायणराव शिंदे

# जुळून येती…

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

जुळून येती...

लेखक : चंद्रकांत नारायणराव शिंदे, बेळगाव,

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप –9483458889

ई मेल -- ccnnss05@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २१ मार्च २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक : चंद्रकांत नारायणराव शिंदे, बेळगाव,



मला साहित्याची आवड पहिल्यापासूनच होती.

प्रथम मराठी आणि नंतर इंग्रजी समग्र घेऊन पदव्युत्तर परीक्षेसाठी अभ्यास करीत असता सर्व साहित्यप्रकारांचा कीस काढला होता. पण विशेष आवडलेला प्रकार म्हणजे लघुकथा. ओ हेंरी, गाय दी मोपासा यांच्या कथेने मी भारावून जायचो. नतमस्तक व्हायचो. नंतर खांडेकर आणि गंगाधर गाडगीळ यांनी मनाचा ताबा घेतला. काही दिवस व. पूंचे कथाकथनही भावले. व्यंकटेश माडगुळकरांच्या निवेदन शैलीने चांगलेच गुंगवले होते. तसेच गोविंदाग्रजांपासून कुसुमाग्रजांपर्यंतच्या कवितेनेही मी मंत्रमुग्ध झालो होतो. विशेष डोक्यात शिरला तो तुकाराम. हे सारे एका बाजूला आणि जगद्विख्यात नाटककार शेक्सपीयर एका बाजूला. त्याच्या भाषाशैलीने आणि प्रतिभेने तर वेडच लावले होते. जमेल तिथून मी त्याचे सहित्य मिळविले. जबरदस्त प्रतिभावंत. त्याच्या नाटकांचे कथाकथनही मी करायचो, खूप आनंद व्हायचा.

मध्यंतरी कांही ग्रंथालयाचे सभासदत्व घेऊन प्रचंड ग्रंथसाठाही केला. कालांतराने सुमारे तीनशे मराठी ग्रंथ डोंबिवलीस्थित एका महाविद्यालयाला समर्पित केले. स्पर्धा परिक्षांना मार्गदर्शन करीत असता सामान्य ज्ञानाचा ग्रंथसाठाही भरपूर केला. इंग्रजी व मराठी दैनिकांशिवाय विविध क्षेत्रातील ज्ञानाचा वाहता झरा अंगणी असावा या हेतूने रीडर्स डायजेस्ट, फ्रंटलाईन, इंडीया टुडे, सी एस आर ई मासिके सकाळ, लोकप्रभा साप्ताहिके यांचा रतीबच कित्येक वर्षे लावलेला आहे. त्यांचा खरा उपयोग मला स्पर्धा परिक्षेच्या मार्गदर्शनासाठी झाला. शिवाय उत्कृष्ट ज्ञान आणि विचारधन सदोदित देत रहाणारी कात्रणे संग्रहित करणे हा तर व्यासंगच होऊन राहिला आहे. पुण्यातील युवाशक्ती या संस्थेतर्फे केलेल्या सह्याद्री आणि हिमालयातील अनेक

पदभ्रमणात आणि घरी चित्रकलेच्या प्रदीर्घ व्यासंगातसुद्धा साहित्यसहवास कधी चुकविला नाही. विद्यादेवतेची कृपा.

शिवाय दरवर्षी सहित्यसंमेलनाला हजर राहणे हे व्यसनच होऊन बसले आहे. अशा साहित्यिक सुगंधाने मन तृप्त आणि समाधानी होते.

आता ई साहित्य प्रतिष्ठान कडून मिळालेल्या अनेक ग्रंथांचे भले मोठे दालनच मी आयपॅडवर उघडले आहे. माझ्यासारख्या साहित्यरसिकाला ही तर खास सुंदर मेजवानीच. या सर्व वाचनव्यवहाराने आणि विशेषत: मुंबापुरीच्या जीवनानुभवाने खजिना भरून गेला. वाटले याचे परिवर्तन आपण खास आपल्या स्वत:च्या साहित्यात करू. आणि बऱ्याच विचारमंथनाने लेखणीने अक्षरलेखन सुरू केले. एका वेगळयाच दिव्यानंदात मी स्वत:ला हरवून बसलो

चंद्रकांत नारायणराव शिंदे, बेळगाव,

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप –9483458889

ई मेल -- ccnnss05@yahoo.com

## मनोगत

कित्येक वर्षांमागे लघुकथा या साहित्यप्रकाराचा मनसोक्त आस्वाद घेतला ओता. हरी नारायण आपटे आणि वि. स. खांडेकर यांच्या कथेपासून ते गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले यांच्या नवकथांपर्यंत आणि पुढे व्यंकटेश माडगुळकर, व. पु. काळे यांच्यापासून ते द. मा. मिरासदार, प्रवीण दवणे इत्यादीपर्यंत अनेक कथांचे वाचन आणि मनन करताना मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी एक ठिणगी पेटलेली अनुभवली होती. तिथूनच या फिनिक्स पक्षाने झेप घेतली आहे.

जे जे आपण पाहिले, अनुभवले, ज्या व्यक्तींच्या सहवासातून ज्ञान आणि सुविचार उमगला, जीवनाचा अर्थ उलगडला ते ते सारे इतरांना मनोरंजक आणि उद्बोधक व्हावे आणि त्याचबरोबर सरस्वतीच्या आशीर्वादाने काही साहित्यसेवाही घडावी तसेच अनेक वर्षे मराठी सारस्वताकडून जे अमृत प्राशन केले त्याची प्रचीती आणि फलश्रुती या लेखनातून व्यक्त करावी ही फार वर्षांपासूनची इच्छा होती, ती या पुस्तकाद्वारे पूर्ण होते आहे हे पाहून मनस्वी आनंद झाला. पण माझ्या इच्छा आकांक्षाना मूर्त स्वरूप देण्याचे जे बहूमुल्य कार्य इ साहित्य प्रतिष्ठानने केले त्याबद्दल मी ई साहित्य टीमचा अत्यंत ऋणी आहे. या संदर्भात मला वेळोवेळी प्रोत्साहन देऊन माझ्याकडून लेखन करवून घेणाऱ्या पुण्यनगरीच्या लेखिका केतकी शहा यांचाही मी आभारी आहे. त्यांच्या मदतीशिवाय मी हे पाऊल उचललेच नसते. फेसबुक व व्हॉट्सअॅपनेही माझ्या लेखनाला भरपूर हातभार लावलेला आहे. अगदी अमेरिकेतूनही त्या माध्यमामार्फतच माझा साहित्यिकांशी परिचय वृद्धिंगत झाला आणि ई साहित्य प्रतिष्ठानचे सहकार्य लाभले. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री. सुनील सामंत सर यांचा. पूर्वओळख नसताना केवळ माझे साहित्य वाचून त्यांनी मला सहजगतत्या जे प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा शतश: आभारी आहे. सर्वच क्षेत्रातल्या नवोदित कलाकारांना आज अशा आधाराची नितांत आवश्यकता आहे.

चंद्रकांत नारायणराव शिंदे, बेळगाव,

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप –9483458889

ई मेल -- ***ccnnss05@yahoo. com***

## *अर्पण पत्रिका*

स्वत: प्रचंड हाल अपेष्टा सहन करून आम्हा भावंडाना सदाचरणी व सुशिक्षीत नागरिक जिने बनविले, जगण्याचा खरा अर्थ जिने आपल्या उदाहरणातून दर्शविला, सहनशीलतेचा परमोच्च बिंदू गाठून जिने अण्णांच्या पश्चात आपल्या मुलांच्या जीवनाला आकार आणि आधार दिला त्या देवासमान मातोश्री आक्काच्या चरणी मन:पूर्वक सादर अर्पण.

# जुळून येती

( कथासंग्रह )

अनुक्रमणिका

अनिता

कठीण समय येता

अनोखे पर्यटन

दार्जिलिंग प्रसन्न

क्लास

# अनिता

भर दुपारी तारवाला पोस्टमन दारात उभा. त्याच्या हाकेने स्वयंपाकघरातून आक्का व दुसऱ्या खोलीतून सुरेश बाहेर आला. मी तर समोरच होतो.

“ कुणाची तार आहे बघ?” डोक्यावर पदर घेतच आक्काने घाबरून विचारले.

“ सही करून दे आणि उघड लवकर” सुरेशही घाबरलेलाच होता. मजकूर वाचेपर्यंत कुणालाच धीर धरवेना. मनाचा थरकाप उडालेला. कारण चार दिवसापूर्वीच आण्णा रजा सम्पवून नोकरीवर रूजू झाले होते. प्रकृती तशी बेताचीच असल्याने न जाण्याबद्दल आम्ही सर्वांनीच आग्रह धरला होता.

मी तार वाचली आणि मोठ्ठा उसासा टाकला आणि लगेच आनंदाने आक्काला सांगितले,

“ आक्का, मला नोकरी लागली. ”

आक्काला खूप हायसे वाटले, तिने तो तारेचा कागद घेतला व त्या मजकूरावरून नजर फिरवली. वाचता आले नाही तरी तिला ती अक्षरे गोड वाटली.

“ You are appointed, start immediately. ”

सुरेशला मजकूर वाचून आश्चर्य वाटले, त्याने मला विचारले, ” तू कधी नोकरीसाठी अर्ज केला होतास?”

“ अरे, पण एवढ्यात तुला नोकरीची काय गरज होती?” आक्काला अजून मी शाळकरी मुलगाच आहे असे वाटत होते.

एकूण आनंद, शंका, कुतूहल, आश्चर्य, प्रश्न अशा सर्व भावभावनांचा गुंताच झाला होता. अखेर तारेचा कागद तसाच हातात धरून आम्ही सगळे खाली चटईवर बसलो. आक्काच्या

मांडीवर डोके ठेऊन मी आडवा झालो आणि तिची समजूत काढली. थोड्याच दिवसात परत येईन असे आश्वासनही दिले, तेंव्हा कुठे तिचे समाधान झाले.

आश्चर्याची लाट ओसरल्यानंतर सारे जमिनीवर आलो. विवेकानंद विद्यामंदिर, माजाळी, सदाशिवगड, कारवार एवढाच पत्ता. कारवार कुठे आहे आणि सदशिवगड कुठे आहे काहीच कल्पना नव्हती. सुरेशने नकाशा पाहून संशोधन सुरु केले. अंदाजे पत्ता लागला.

सामानाची बांधाबांध करता करता आक्काला जाणवले की मी पहिल्यांदाच नोकरीनिमित्त घराबाहेर आणि तेही दूरवर जाणार होतो. नकळत तिने पदराने डोळे पुसतच जड अंत:करणाने सारे केले. चार भावंडांमध्ये मी आक्काचा लाड्का. तिच्याबरोबर जात्यावर दळण दळू लागणारा, स्वयंपाकात हातभार लावणारा, बाजारहाट करणारा आणि महत्वाचे म्हणजे सतत सिनेमाची गाणी गुणगुणत, विनोद करत घर हसते ठेवणारा. त्यामुळे माझे दूर जाणे म्हणजे आक्काला दुसरा मोठा धक्काच होता. पहिला जबरदस्त धक्का आमची एकुलती एक ताई लग्नानंतर सासरी गेली तेंव्हा बसला होता. त्यातून सावरायलाच तिला कित्येक महिने लागले होते. खूपच हळवी.

गरजेपुरत्या सामानाची एकच बॅग घेऊन आम्ही स्टेशन गाठले. वसंतने तिकिट काढून आणले. गाडी हलली तसे त्याच्या डोळयात पाणी तरळले, रडवेल्या आवाजातच त्याने कसेबसे, " सांभाळून जा, " म्हंटले व हात उंचावून “ पोचल्यावर पत्र पाठव” म्हणत टाटा केला, आणि तेंव्हा मात्र माझा बांध फुटला. तो दिसेपर्यंत मी हात हलवीत राहिलो तरीही हुबळी येईपर्यंत चार तास अश्रूंचा पूर ओसरलाच नाही. बाहेरगावच्या नोकरीने मी माझ्या भावन्डापासून दुरावलो ही खंत बोचत राहिली.

कसाबसा कारवारला पोहोचलो. पण तेथे समजले की कोडिबागपर्यंत बसने जाऊन पुढे बोटीतून जावे. त्याप्रमाणे तेथून काळी नदी बोटीतून ओलान्डून सदशिवगडावर दाखल झालो. मन बिल्कूल तयार नव्हते. बसचा इतका मोठा प्रवासही आयुष्यातला पहिलाच आणि बोटीतून इतकी मोठी नदी ओलांडून जाणेही प्रथमच. ती प्रचंड नदी पाहून माझे तर धाबेच दणाणले. मधूनमधून लाटांचे पाणी बोटीत फेकले जायचे तेंव्हा तर मला आक्का आणि भावन्डांचीच आठवण झाली. जणु कांही मी साता समुद्रापलिकडे परदेशातच निघालो होतो.

सावंत सरांनी मला बरोबर ओळखले आणि आपल्या घरी नेले. कारवारपासून सुरू झालेल्या कोकणी भाषेच्या माऱ्याने माझी जी डोकेदुखी सुरू झाली होती ती सावंतमास्तरांच्या मराठीतून केलेल्या चौकशीने कमी झाली. त्यांनी आपल्या घरीच माझी राहण्याची व्यवस्था केली. माझ्यासाठी एक खोलीही त्यांनी भाडेतत्वावर घेऊन ठेवली होती. त्यांची ती धडपड पाहून मला कसेसेच झाले. चेअरमन सावंतही लगबगीने आले, माझ्यासारख्या अनोळखी तरुणाचे जंगी स्वागत झाले. मी तर मनात पक्का निश्चयच केला होता की या छोट्या कोकणी खेड्यात आपल्याला काही राहायचे नाही. म्हणजे रहावणारच नाही. लवकरच परत जाऊ.

कसचे काय, माझ्या भिडस्त स्वभावामुळे मला स्पष्ट बोलता आले नाही. इतके लोक माझी व्यवस्था आपुलकीने आणि आनंदाने करीत असलेले पाहून मी ओशाळलो. अखेर रजिस्टरवर सही करून कामावर रूजू झालो. महिन्याभरानंतर परत जायचे मात्र नक्की ठरवले

पहिल्यांदाच विद्यार्थी मला सर सर म्हणून् प्रश्न विचारताना मला अवघडल्यासारखे झाले. “ तो मी नव्हेच” असे मला वाटत होते. कोंकणी भाषेने एक डोके उठवले होते. आणि सावंतसर तर म्हणाले की ते कोकणीतूनच शिकवतात. तेही मला निमित्त होतेच.

मला जी खोली रहायला दिली होती त्यात बाथरूमची सोयच नव्हती. विहीरीच्या कट्ट्यावरच आंघोळ करावी लागे. कसाबसा एक महिना शिक्षेसारखा काढून दुसरी चांगली खोली पाहून स्थलांतर केले. पण तिथेही करमेना. एकटा बसायचो तेंव्हा आक्का सुरेश वसंत यांच्या आठवणीने व्याकूळ व्हायचो. एखाद्या सासुरवाशिणीसारखे सतत रडत बसायचो. रडून थकलो की अंतर्देशीय पत्र आणून लिहीत बसायचो. पत्रावरसुद्धा अश्रूंचा पाऊस. अनेक आठवणीने गलबलायला व्हायचे. एकटेपणा खूप जाणवायचा. आजवर कधी घर सोडून दूरवर कधी गेलोच नव्हतो. शिवाय इथे कुणी ओळखीचेही नव्हते.

थोड्याच दिवसात एक संधी चालून आली. शेजारच्याच पी ई स्कूलमद्धे सायन्स शिक्षकाची जागा रिकामीच होती. तिथल्या मुख्याध्यापकांनी रोज तीन तासिका घेऊन पार्टटाईम काम करण्याची विनंती केली. तेंव्हा तिथे सकाळी तीन तास थाम्बायचे व 10. 30 वाजता जमेल तेवढे जेवण करून सायकलवर टांन्ग टाकायची व पूर्ण वेळेची शाळा गाठायची. अशा रीतीने मी पूर्ण दिवस कार्यमग्न झालो.

कांही दिवसातच मी अत्त्यंत लोकप्रीय शिक्षक झालो. चार वर्षे कॉलेजमद्धे एन सी सी चा सार्जेन्ट व नंतर अंडर ऑफिसर म्हणून चांगलाच प्रसिद्ध झालो होतो. शिवाय आधीपासून मी

नेटके कपडे वापरणे, चेहरा आकर्षक ठेवणे, केस नेहमी छानपैकी विंचरायचे या सवयीमुळे, व एक शहरवासी होतकरू तरूण असल्याने माझी चांगलीच छाप विदयार्थ्यांवर विशेषतः विद्यार्थीनीवर पडायची. काही ना काही निमित्त काढून मुली माझ्याभोवती पिंगा घालायच्या. त्यात मी निघालो लक्ष्मणाचा भाऊ. लक्ष्मणाने सीतेचे फक्त पाय पाहिले होते म्हणे चेहरा कधीच बघितला नव्हता. किती नम्रता, किती आदर, किती शुचीता! माझेही तसेच. मुलींच्या चेहऱ्याकडे पाहणे, त्यांच्याशी बोलणे मला तर जमायचेच नाही. उलट मीच लाजायचो. शिवाय त्यांची भाषा कोकणी नी माझी मराठी. साराच गोंधळ.

एक गोष्ट मात्र माझ्या पथ्यावर पडली. कारवारहून एक नवीन शिक्षक हेडमास्तर म्हणून आमच्या शाळेत रुजु झाले. त्यांचे नाव कोलवेकर. ते सुकेरी, कारवारचेच रहिवासी. तेही एकटेच असल्याने मी त्यांना माझ्या खोलीतच रहायला सांगितले. मलाही सोबत झाली आणि घरच्या आठवणीची तीव्रता कमी झाली. पण ते शनिवारी घरी जायचे व सोमवारी परतायचे. त्यांनाही पी ई स्कूलमध्दे पार्टटाइम काम मिळाले. आमच्या दोघांची जोडी चांगलीच जमली. रोज सायकलवरून तीन किलोमीटर जायचे यायचे. हिरव्यागार भातशेतीच्या मधून जाणाऱ्या नागमोडी रस्त्याने सायकल पळवायची म्हणजे कोण आनंद. त्यामुळे काही प्रमाणात तरी मला भेडसावणारा एकाकीपणा थोडा कमी झाला.

एका शनिवारी दुपारी मी एकटाच रिकामा खुर्चीत बसलो असता एक अनपेक्षीत प्रसंग ओढवला. माझी चौकशी करीत एक मुलगी थेट माझ्या दारात. मला पाहताच माझ्या परवानगीशिवाय ती आत तर आलीच शिवाय स्वत:चा परिचय देखिल करून द्यायला लागली. मी अवाक होऊन पहातच राहिलो.

“ सर, मी अनिता देसाई. पी. इ. स्कूलमधला गेटजवळचाच वर्ग. तुमचा पहिला तास असतो ना तेंव्हा मी पुढच्या बेंचवर डाव्या बाजूला बसते. तुम्ही ओळखलं नाहीत मला? मी इकडे एका नातेवाईकांकडे आले होते तेंव्हा समजले की तुम्ही इथे राहता. म्हणून भेटायला आले. ”

माझ्या उत्तराची वाट न पाहता ती तशीच बोलत सुटली. तरी बरे, ती शुध्द मराठीतच बोलत होती. घरात चहूंकडे नजर फिरवीत राहिली-- कुणालातरी शोधल्यासारखी. मला वाटले घरात आणखी कोण कोण आहेत हे तिला पहायचे होते.

" सर, तुमचा तास ना मला खूप आवडतो. सर तुम्ही बोर्डवर त्या दिवशी डोळयाची आकृती किती सुंदर काढली होती. मी ती माझ्या डोळयातच साठवून ठेवली. "

एक सुंदर मुलगी आपणहून घरी आली होती तर मला आनंद होण्याएवजी तिची अडचणच वाटू लागली. कुणी पाहिलं तर नसेल ना. या चाळीतील लोकांचं काय सांगावं. पण एक गोष्ट बरी होती, शेजारची दोन घरं रिकामीच होती. या मुलीची अडचण वाटण्याचं आणखी एक कारण होतं. त्या दिवशी असाच वेळ जात नव्हता व घरची आठवण यायची म्हणून मी एक चित्र काढलं होतं. स्कर्टवरची एक मुलगी पायावर पाय टाकून खुर्चीवर बसलेली अशी ती कॅलेंडरवरची पोझ होती. तिच्या मांडीचा थोडा भाग दिसत होता. तर ती रंगवतानासुद्धा मलाच लाजल्यासारखे होत होते. आणि आता ही बया त्या चित्रासमोरच उभी. आणि ते चित्रं तिच्यासमोरून कसे काढून घ्यायचे या विचारात मी असतानाच ती किंचाळली,

" अहो सर, तुम्ही हे चित्र काढलंत. वारेवा ! ख़ूपच छान ! फळयावरच्या तुम्ही काढलेल्या आकृतीवरूनच वाटत होतं आम्हा मुलींना की तुम्ही चांगले आर्टिस्ट असणार. "

ते चित्र तिने सगळ्या अँगलने पाहिले. पण तिला मला वाटले तसे आक्षेपार्ह असे कांही दिसले नाही. मात्र तेवढा विषय बडबडायला तिला पुरेसा झाला. थोड्या वेळाने तिने सारे घर पाहून घेतले. छान आहे म्हणाली, जेवण कुठे करता, सुट्टीच्या दिवशी काय करता, बाहेर कुठे जाता की नाही वगैरे वगैरे. मी जाणून बुजून तिला उत्तर द्यायचे टाळले. मग तिला एकदम आठवण झाली.

" सर मी निघते, आईने मला गणपतीच्या देवळात बोलावले होते. " घड्याळात पाहता पाहता ती म्हणाली, " सर, हे घड्याळ पहा. माझ्या मामांनी माझ्या वाढदिवसाला दिले होते. उद्या मी तुम्हाला आणखी एक गंमत दाखवते. "

पुढे दर शनिवारी संध्याकाळी व रविवारी सकाळी ती नेमाने यायला लागली. अगदी बिंनधास्त, कांही आढेवढे नाहीत, लाजणं मुरकणं नाही, येण्याची परवानगी देखील मागायची नाही. जणु कांही तिने माझा व माझ्या खोलीचा ताबाच घेतला होता. नेहमी काहीना कांही नवीन वस्तू आणून ती दाखवायची आणि सतत मामाचं कौतुक. मला त्या मामाचा हेवाही आणि मत्सरही वाटायचा. भाग्यवान आहे मामा वाटायचं. पण तिच्या निरागसपणाचं मला खूप कौतुक वाटायचं.

लहान मुलांसारखा निष्पापपणा तिच्या वागण्यात होता. म्हणूनच मला तिचा राग कधी आला नाही.

शनिवार आला की मला धास्तीच वाटायची, तिला चुकवायचं कसं हेच सुचत नव्हतं. कुठे जाणार, कोणी मित्र नाही, गावात कुणी ओळखीचे नाही. बाग बगीचाही कुठे दिसला नाही. पण कोणत्यातरी अनामिक ओढीने मी बसून राहायचो. केस नीटनेटके करून चांगले कपडे परिधान करून काहीना काही काम करीत राहायचो. नाहीतर पेंटिंग. माझी चित्रकलाही अशाने सुधारू लागली.

एकदा ती ठरल्या वेळी बरोबर आली. मी पेपर तपासत बसलो होतो. येताच तिने पर्समधून एक नेलकटर काढला. मी नेलकटर ही चीजच कधी पाहिली नव्हती.

ती म्हणाली, "सर, हा फॉरीनचा नेलकटर आहे पहा. मामांनी तो गोव्याहून आणला."

त्याचे सात आठ भाग तिने वेगवेगळे करून दाखवले. मी त्या वस्तूकडे पाहातच राहिलो. पण तिच्या चेहऱ्याकडे पाहण्याचे मात्र धाडस होत नव्हते. बोलता बोलता ती जर जवळ आली तर एक छानसा मादक सुगंध यायचा. खूप बरे वाटायचे. हळूच तिचा गोरापान हात पकडावा असा मोह व्हायचा, पण क्षणभरच. ताबड्तोब मी सावरायचो. माझ्यातला शिक्षक आणि लक्ष्मणही जागा व्हायचा.

पेपर तपासण्यात व्यत्यय आल्याने मी वैतागलो होतो, म्हंणालो, "अग मला हे पेपर तपासायचे आहेत, सोमवारी द्यायचे आहेत मला."

ती लगेच म्हणाली, "मी करते ना तुम्हाला मदत. पेपर तपासता येणार नाहीत मला कदाचित, पण टोटल नक्कीच करून दैईन." खूप जुनी ओळख असल्यासारखी ती स्वच्छंदपणे बोलायची.

आणि ती कामाला लागलीच. मला तिच्या मोकळेपणाचे खूप कौतुक वाटले. भिडस्तपणा नाही. अगदी डोळ्यात डोळा घालून दिलखुलास पणे ती बोलू लागली की मी फक्त श्रोत्याचे काम करायचे. तिचे पोर्ट्रेट काढण्याची मला कधी जबरदस्त इच्छा व्हायची पण सांगणार कसे.

एक बरे झाले. माझे दोन्ही गट्ठे तासभर आधीच सम्पले. ती बेरजा करीत होती तेंव्हा मात्र तिची नजर चुकवून मी तिला जवळून पहिले. एखाद्या सुंदर चित्रापेक्षाही तिची कांती उजळ होती. बोटांची आणि हातांची हालचालही खूप मोहक होती. डोळेतर टपोरे आणि काळेभोर. मला न राहवून आठवायचे ते ना. सी. फडके यांच्या कादम्बरीतील नायीकेचे वर्णन. लेखक मंडळी खरच लबाड असतात असं मला वाटून गेलं. मधूनच आमची नजरानजर झालीच तर ती प्रसन्न हसायची. तेंव्हा तर ती खूपच सुंदर दिसायची. कोणताही मेकअप न करता तिचा चेहरा नैसर्गिक सौंदर्याने खुलून दिसायचा. मी भारावून जायचो. असे तिचे ते सौंदर्य पहात राहताना मला एक स्वर्गीय आनंद व्हायचा. देवाने अत्यन्त आवडीने बनविलेले हे सुंदर शिल्प मी कागदावर पोर्ट्रेटच्या रूपात उतरवू शकणारच नाही असे मला वाटायचे. तिची एक सुंदर छबी माझ्या कॅमेऱ्यात तरी साठवून ठेवावी असे वाटायचे. पण तसे बोलण्याचे धाडस मी करूच शकत नव्हतो.

असाच सिलसिला चालत राहिला. शनिवारी ती येणार हे जणू ठरूनच गेले होते. माझे वाचन पेटींग चालूच रहायचे. ती आली की वेगवेगळया विषयावर तिची बडबड चालू रहायची. नकळत ती माझ्या वैयक्तिक जीवनाचा एक अंगच बनून गेली. हळुहळू माझाही लाजरेपणा कमी झाला. कधी विनोद, मस्करी कधी एकमेकाची स्तुती असा प्रकार सुरू झाला. नंतर नंतर कधी ती आल्या आल्या प्रश्नच विचारू लागायची. पुढे तर मी तिची आतुरतेने वाट पाहू लागलो. कधी ती तिच्या मामाच्या हुशारीबद्दल सांगायची. एक मात्र चांगले झाले की अडखळत का होईना मी कोंकणी बोलायला शिकलो. ती मला सविस्तरपर्णे भाषांतर करून कोंकणी भाषेबद्दल सांगायची. ती स्वत: कोंकणी बोलताना मला ऐकतच रहावे वाटायचे. कर्वे सरांनी एकदा मला सांगितले होते की स्त्रीयांच्या तोंडी कोंकणी भाषा खूपच गोड वाटते. खरेच होते ते.

दिवसामागून दिवस कसे गेले समजलेच नाही. दोन्ही शाळेत माझा चांगलाच जम बसला. मी विद्यार्थीप्रीय शिक्षक बनलो. वर्ष सम्पले आणि उन्हाळयाची सुट्टी लागताच मी गावी पलायन केले. पण त्यापूर्वी सर्व मुलामुलींनी मला निक्षून पण प्रेमाने सांगितले होते की पुढच्या वर्षी नक्की या. त्यांचा निरोप घेताना माझा ऊर भरून आला होता. मला तर सारेच नवीन आणि अनपेक्षित होते. इतके प्रेम मी कधी अनुभवलेच नव्हते. तिथून निघताना रविवार होता त्यामुळे मी अनिताची खूप वाट पाहिली पण ती आली नाही. थोडासा हिरमुसला होऊनच मी निघालो.

मी बऱ्याच दिवसाने घरी आल्याने घरी सर्वांना खूप आनंद झाला. आक्काला तर दिवाळीच आल्यासारखे वाटले. मी येताना गडावरच्या बाळू सुताराने केलेले सागवानी लाकडाचे टेबल व खुर्ची घेऊन आलो होतो. त्याचेही कौतुक झाले. पेज करण्यासाठी उकडे तांदूळही आणले

होते. भावंडात रमल्याने व आक्काच्या सानिध्यात व उबेत राहिल्याने मी माहेरवाशिणीसारखा खूप सुखावलो. आणि शाळा, गड, विद्यार्थी आणि अनितालाही विसरून गेलो. कधी कधी परत जायचेच नको असे वाटायचे.

एकदा मी असाच बाहेर निघालो होतो तर अचानकपणे पोस्टमनने माझ्या हातात एक अंतर्देशीय पत्र दिले. मी तसाच बाहेर गेलो नी सावकाशीने ते पत्र उघडले. आश्चर्याचा जबरदस्त धक्काच बसला. अनिताचे पत्र होते. मला समजेना की तिला माझा पत्ता कसा मिळाला. मला आनंद तर झालाच पण तिला न भेटता आल्याचे वाईटही वाटले. नकळत डोळे पाणावले. बरे झाले घरी कुणाला समजले नाही.

अनिताने मोजक्याच चार पाच ओळी लिहील्या होत्या पण ह्रुदयाचा ठाव घेणाऱ्या. अक्षर तर जणू मोतीच.

*“ सर, मी पहिल्यांदाच पत्र लिहीत आहे तेंव्हा कांही चुकले तर हसू नका. सर, तुम्ही कधी गेलात व कुठे गेलात समजलेच नाही. मी दोन वेळा तुमच्या खोलीवर गेले पण कुलुप पाहून खूप निराशा झाली. मग समजले की तुम्ही सुट्टीवर गावी गेला आहात. मला इथे बिलकुल करमत नाही. तुमची खूप आठवण येते. मी तुम्हाला खूप त्रास देत होते याचे वाईट वाटते. क्षमा करा. तरीही सुट्टी सम्पताच लवकर इकडे या. मी आपली वाट पाहते. --------*

*तुमची ‘ अनिता ‘*

“ तुमची” या शब्दाने तिने माझ्या ह्रुदयालाच हात घातला होता. किती साधे सरळ पत्र.

पत्र वाचून डोळे पाणावले, अनिताला दुखावल्याचं वाईट वाटू लागलं. लायब्ररीत बसून चारपाच वेळा ते पत्र वाचलं. ती समोरच आहे व नेहमीसारखी माझ्याशी बोलते आहे असे

वाटायचे. त्या मोजक्या चार ओळीत तिने आपलं मंनच ओतलं होतं. मी खरोखर गलबलून गेलो. माझ्या सहवासाचं तिला ईतकं वेड लागलं असेल असं वाटलं नव्हतं. मनात कुठेतरी सुखावलोसुद्धा.

सुट्टी सम्पवून मी परत सदाशिवगडावर पोचलो हे अनिताला कसे समजले माहित नाही पण दुसऱ्याच दिवशी ती सकाळी हजर झाली. आनंदाने तिने माझा हात हातात घेऊन स्वागत केलं. किती निष्पाप व निरागस मनाने आणि आपुलकीच्या भावनेने तिने हात धरला होता. तो क्षण मी आयुष्यभर विसरणार नव्हतो. तिच्या त्या पहिल्या स्पर्शाने मी मोहरून गेलो. मीही बराच वेळ तिचा हात तसाच धरून राहिलो, जणू मी तिची क्षमाच मागत होतो. मग मात्र लगेच सावरलो. आक्काने दिलेले लाडू मी तिला दिले आणि पुढे तासभर आमच्या गप्पा झाल्या. आपली वाट पाहणारे आपलं स्वागत करणारे कुणीतरी आहे या विचाराने मला बरे वाटले. खूप सुखावलो.

दिनचर्या सुरू झाली. पण अनिता आणि माझ्या सम्पर्कात बराच गॅप निर्माण झाला. तिचे येणे जरा कमी झाले. दोन चार रविवार कोरडेच गेले. मला करमेनासे झाले. वाटायचे ती आपल्याला विसरून तर गेली नसणार. चौकशी अंती समजले की ती कारवारच्या कॉलेजला जाते. काळी नदी बोटीतून ओलांडून पुढे बसने कॉलेजपर्यंत जायचे. अशाने तिचा रोजचा तीन तासाहून अधिक वेळ येण्याजाण्यातच जायचा. पण नंतर रविवारी मात्र ती हटकून हजर राहू लागली. तिच्या मामाने तिला दिलेल्या वस्तू मला आणून देणे किंवा दाखवणे हे काम चालुच राहिले. पॉन्ड्स पावडरचा डबा, स्नोची डबी, पर्फ्युम, नेलकटर, कीचेन, पैशाचे पाकीट, पेन, कंगवा, आरसा, टाय एक ना दोन. माझे छोटे कपाट तिच्या या भेटवस्तूनेच भरून गेले होते. तिचा मामा मला कंसमामाच वाटू लागला. तो कसा आहे हे बघावेसेही वाटत होते.

तिच्या बोलण्याच्या विषयात एक बदल झाला. आता ती मला केमिस्ट्री आणि ईंग्लीशच्या डिफिकल्टी विचारू लागली. माझा ईंग्लीशचा अभ्यासतर दांडगा होताच पण प्रचंड अवांतर वाचन असल्याने मी तिला इतर विषयातही भरपूर माहिती पुरवू शकत होतो. माझ्या ज्ञानाचा माझ्याहून तिलाच जास्त अभिमान वाटायचा. कारण या माहितीवर ती आपल्या मैत्रिणींच्या घोळक्यात भाव खायची. रोज नवीन प्रश्न नवीन शंका. विषयाची तर मर्यादाच नाही. कधी इतिहास, भूगोल, राजकारण, संगीत असे विविध विषय.

एकदा तिला काय वाटले माहित नाही पण तिने मला तिच्या मामाला भेटण्यासाठी बोलावले. मलाही कुतुहल होतेच. दिवस ठरला. तिने मला एका रविवारी आपल्या घरी नेले. मामाची आणि आईची ओळख करून दिली.

“ मामा, हे आमचे सायन्सचे सर बरंका. खूप छान शिकवितात. शाळेत सगळया विद्यार्थ्यांचे ते लाडके आहेत. शिवाय ते चांगले आर्टीस्टही आहेत. त्यांची पेंटींग्स मी पाहिलीत. पण आमच्या शाळेत ते दोनच तास घेतात म्हणून आम्ही नाराज आहोत. ते मराठीच आहेत पण मी त्यांना कोंकणी शिकवली आहे. ” या माझ्या स्तुतीने मी भारावून गेलो. काय बोलावे तेच समजेना.

तिची आई खूपच सुंदर होती. “ अशीच अमुची आई असती --- “ असा विचार क्षणभर माझ्या मनात आला. अनिताने मामाला माझी ओळख खूपच तिखटमीठ लावून करून दिली होती. माझ्याबद्दल तिचं काय मत होतं ते मला स्पष्ट्पणे जाणवलं. त्यावरून समजलं की एक सर म्हणून नव्हे तर आवडता बॉयफ्रेंड म्हणूनच तिचं माझ्यावर चांगलच प्रेम जडलेलं आहे. मलाही तिच्याबद्दल असेच वाटते का याचा मी विचार करू लागलो.

मी मात्र प्रसंगावधान राखून एक गोष्ट केली. माझ्याकडे त्यावेळी याशिकाचा कॅमेरा होता. नेहमी मी तो घेवूनच फिरायचो. तिथला हिरवागार निसर्ग मला खूप आवडायचा. कारवार, कोडिबाग, सदाशिवगड, सुंकेरी, देवबाग इथले बरेच फोटो मी काढले होते. मला खूप दिवसापासून अनिताचा फोटो काढून जवळ बाळगावा असे वाटत होते. हे प्रेमात पडल्याचेच लक्षण होते की काय माहित नाही. आजपावेतो ती एकटीच कितीतरी वेळा माझ्या घरी यायची, वेगवेगळया पोजमध्ये बसायची, हेतूपुरस्सर असेल कदाचित. पण मी त्या संधीचा कधी दुरूपयोग केला नाही, कधी तिचा फोटो काढण्याचा विचारही मनात आला नाही. तेवढे धाडसच नव्हते. मी तिच्या त्या पोझेस केवळ मनात साठवून ठेवल्या होत्या. आज मात्र ही नामी संधी चालून आली होती.

मी अनिताला म्हटलं, ” मामाबरोबर माझाही एक फोटो काढ ना, तेवढीच एक आठवण. “

तिने तात्काळ माझी ईच्छा पूरी केली. मी मग लगेच म्हणालो, " आता तू तुझ्या लाडक्या मामांबरोबर उभी रहा. म्हणजे तुलाही एक छानसा फोटो मिळेल. “

आणि मी तिचे वेगवेगळया अॅन्गलने दोंनचार फोटो काढले. नंतर मी कांही फोटो एंनलार्ज करून तिला दिलेही. तिचे फोटो खूपच सुंदर आले होते. थोडीशी अवखळ, थोडीशी खेळकर आणि स्मार्ट पण बरीचशी मनमोहक. पाहताच नजर खिळवून ठेवणारी अशी तिची छबी. असा एक सुंदर फोटो तर कायमचा माझ्या खिशात मी ठेऊन दिला.

“प्रत्यक्षाहूनी प्रतीमा उत्कट---“” असेच मला वाटले. तेंव्हा मात्र मी तिच्या प्रेमात पडलो याची खात्री झाली. एका फोटोत तर ती खूपच सुंदर आणि स्मार्ट दिसत होती. तिला बिलगून राहिलेला तिचा सुळसुळीत स्कर्ट तर अफलातून दिसत होता. भेटीचे सार्थक झाले असेच वाटले.

माझा एक शाळकरी मित्र, श्रीनिवास, मुम्बईला ए जी ऑफिसमध्ये नोकरीला लागला होता. त्याच्या वरचेवर येणाऱ्या पत्रात मला उद्देशून कायम दोन वाक्य असायची.

“तिकडे खेड्यात काय करतो आहेस इकडे ये. सायंन्स ग्र्याजुएट्सना इथे खूप डिमांड आहे.“

न राहवून मीही त्याने सांगितलेल्या दोन चार ठिकाणी अर्ज केले होते. नाहीतरी मला ईकडे खेड्याच्या छोट्याशा जगात कोंडल्यासारखे वाटत होते. लहान भावंडांच्या शिक्षणासाठी मला मोठ्या पगाराच्या नोकरीची गरजही होतीच. शिवाय जमले तर उच्च शिक्षणही घ्यायचे होते. पण हे सारे मी पार विसरून गेलो होतो, अर्थात त्याला दोन कारणे होती. शिक्षकाची दीड नोकरी, जिच्यामुळे मला विचार करायला वेळच मिळत नव्हता. आणि अनिताचे आकर्षण. तिच्यापासून दूर जाणे म्हणजे प्रतारणा वाटत होती. मी पुरता गुंतून गेलो होतो. भविष्यकाळ अंध:कारमयच होता.

दिवाळीची सुट्टी लागली आणि कधी नव्हे ती अनिता माझा निरोप घेऊन आईबरोबर मामाकडे गेली. मी पूर्णपणे रिकामा झालो. घरात बसल्या बसल्या अनिता आल्याचा भास व्हायचा. खिशातला तिचा फोटो हाच थोडा विरंगुळा वाटायचा. कधी वाटे घरी जाऊ आठ पंधरा

दिवस म्हणजे अनिताचा कांही दिवसापुरता तरी विसर पडेल. कसचे काय, एक दिवस अचानक मुम्बईहून श्रिनिवासचे पत्र आले. दोन तीन ठिकाणी मुलखतीचे आमंत्रण होते. “ पडत्या फळाची आज्ञा ” म्हणून आणि पाहू काय होते या विचाराने मी निघालोच.

त्यानंतर मात्र घटना इतक्या वेगाने घडत गेल्या की मी असहायच झालो. शाळेच्या नोकरीचा राजिनामा देऊन गाव सोडणे अनिवार्यच झाले. एकदा तर वाटले अनिताला सोडून नकोच जायचे, पुढे जायचेच ठरले तर तिला घेऊनच जाऊ. प्रचन्ड ओढाताण, मन व्याकूळ झाले. पण घराकडच्या जबाबदारीने मी भानावर आलो. डोळयात पाणी तरळत असताना मुम्बईची बस पकडली. निर्धार पक्का केला की कांही दिवसातच अनितालाही घेऊन जाऊ. तिला न भेटता न सांगता निघाल्याने पराकोटीचे दुख झाले.

पाहता पाहता मुम्बापुरीने माझ्या महत्वाकांक्षेला आव्हान देऊन मलाच गिळंकृत केले. मी “ मी “ राहिलोच नाही. नोकरी, ओव्हरटाईम, ट्रेनिंग, पदव्यूत्तर शिक्षणाची संधी यात मी पुरता गुरफटून गेलो. अशी फरफट होत असतानाच वसंतचे आक्काच्या आजारपणाची बातमी सांगणारे पत्र आले. बऱ्याच दिवसात भेटलो नव्हतो म्हणून वाईट वाटले.

रजा मिळवून घरी जाईपर्यंत सारेच आटोपले होते.

माझी आक्का मला न सांगताच निघून गेली होती. मी अक्षरश: ढासळलो. मुम्बईला परत आले ते माझे शरीर होते, मी आक्काबरोबरच अनंतात विलीन झालो होतो. आक्काचे जाणे माझ्या मनाला इतके लागले की मी एका खोल गर्तेत जाऊन पडलो. जीवन निर्गूण, निराकार आणि बेचव झाले. मनाने शरीराचा कब्जाच घेतला होता. मोठ्या यशाची आशा, महत्वाकांक्षा, स्पर्धा याचा स्पर्शही झाला नाही. एक प्रकारचे वैराग्यच आले होते.

अखेर कधीतरी माझ्या दु:खावर काळाने पांघरून घातले. तरी अनिताच्या नसण्यापेक्षा आक्काचे नसणे जिव्हारी झोम्बले होते.. पण जबाबदारी ओळखून भावंडाच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. त्यांना माझ्या आधाराची खरी गरज होती. त्यांनाही या धक्क्यातून बाहेर पडायला वेळ लागला. सारे कळत असूनही मला स्वत:ला सावरायला खूप दिवस लागले. मी स्वत;ला अभ्यासात पुरेपूर गाडून घेतले. कामाच्या कवचात गुरफटून घेतले.

दिवसामागून दिवस जात राहिले. कॅलेंडरची पाने उलटत राहिली. तीनही भावांना उत्तम नोकरी मिळाली. मी धन्य धन्य झालो. त्यांच्या विवाहाचा प्रश्न मोठा वाटला नाही. पण माझ्या विवाहाचा कोणी प्रश्न उभा केला की माझ्या डोळयासमोर नकळत अनिताचा निष्पाप आणि निरागस चेहरा उभा रहायचा. दुसऱ्या कोणत्या तरुणीकडे मला पहावेसेही वाटत नव्हते. त्यामुळे माझ्या लग्नाचा विषय मी बाजुलाच काढून ठेवला. कुणाला हातही लवू दिला नाही. सर्वांना याचे कोडेच वाटत होते.

कधी अगदीच शांत असा एकांत मिळाला की अनिताच्या आठवणीने मी व्याकूळ व्हायचो. अपराधीपणाची भावना उफाळून यायची, मन कापून जायची. तिचा आपण निरोपच घेतला नाही, कुठे व का जाणार आहे, कधी येणार का कांही तिला सांगितले नव्हते. तिच्या शेजारीतरी निरोप ठेवायला हवा होता. तिची आपण खरोखरच मोठी फसवणूक केली असे वाटू लागले.

न राहवून एकदा एक सविस्तर पत्र लिहून पाकिटात घातले, अंदाजे तिच्या घरचा पत्ता लिहिला व पोस्टात टाकले. प्रत्यक्षच सारे सांगून टाकले असा भास होवून मनाला हलके हलके वाटले. पुढे रोज आतुरतेने उत्तराची वाट पहात राहिलो. अखेर 20—25 दिवसाने माझेच पत्र भिरभिरत परत आले. खूप निराश झालो. विचार करून करून डोके सुन्न होऊ लागले. कांही दिवसाने लाज शरम याची बिलकुल तमा न बाळगता माझ्या तिथल्या एका शिक्षकमित्राला पत्र पाठवून तिची चौकशी करायला सांगितले. लगेच त्याचे उत्तर आले पण त्याने लिहीले होते की रस्ता रुंदीकरण व नवीन पुलाच्या बांधकामामुळे बरीच घरे दुकाने पाडली गेली होती व नदीवरून मोठा पूल झाल्याने अनेक कुटुम्बांनी सदशिवगड सोडून कारवारलाच स्थलांतर केले होते. अनिताचे घरही त्यात गेले होते. थोडीबहूत आशा होती तीही नाहीशी झाली.

कम्पनीच्या कामानिमीत्त मला वरचेवर प्रवास करावा लागे. एकांतापासून सुटका म्हणून मी तो आनंदाने करीत असे. तशातच कम्पनीने मला अमेरिकेत प्रमोशनवर पाठविण्याचा निर्णय घेतल्याने वैतागून मी अमेरिकेला निघून गेलो. तेही दोन वर्षासाठी. पण परिणाम उलटाच झाला. एकटेपणा खूपच जाणवू लागला. संध्याकाळी मला वेळ बराच मिळायचा. रिकामा एकटाच डोळे मिटून बसलो की अनिता आल्याचा भास व्हायचा. शिवाय स्वप्नातही ती हमखास यायची. मन खायला उठायचे. पाकिटातून अनिताचा फोटो काढून पहात रहायचो. सदाशिवगडचे ते मधाळलेले आणि अनिताच्या सहवासाने सुगंधीत झालेले ते दिवस आठवायचे, आणि डोळयात

अश्रू तरळायचे. तेंव्हाच मी ठरवून टाकले की भारतात परत जाताच तिचा शोध घ्यायचा. कुठे भेटेल ती, कशा अवस्थेत असेल, लग्न केलं असेल का, माझी आठवण तिला येत असेल का—नाना प्रश्न –उत्तर नसलेले. ती कुठेही असो आपण तिला शोधायचे व भेटायचेच असे मी ठरवून टाकले. तेंव्हा कुठे मन शांत झाले.

अमेरिकेहून परतताच मोठी रजा मंजूर करून घेतली आणि विषण्ण मनाने देशोधडीला लागल्यासारखा कारवारच्या दिशेने निघालो. गडावर पोचताच पहिल्यांदा अनिताचे घर जिथे होते त्या जागेवर पोचलो. रस्ता बराच रूंद केल्याने अनिताच्या घराची इमारत व आजूबाजूची चाळीवजा घरे व त्याभोवती असलेली नारळाची झाडे, सर्वच नेस्तनाबूत झाले होते. तिथून जवळच असलेल्या लोकांना विचारले असता समजले की ती सर्वच कुटुम्बे कारवारला शिफ्ट झाली होती. मी तसाच पूर्वी रहात होतो त्या चाळीतील खोलीकडे पोचलो. तिथे एक कुटुम्ब रहात होते. ते घर पहाताच अनिताची तीव्रतेने आठवण झाली. इथेच आमची पहिली ओळख झाली होती.

कांहीही ठावठिकाणा, पत्ता माहित नसता मी तसाच शोकाकूल अवस्थेत कारवारला पोचलो. तिथे तर ओळखीचे कुणीच नव्हते. तरीही दोंनचार तास वेगवेगळया रस्त्यांवरून फिरून आलो. न जाणो चुकून कुणी ओळखीच भेटायचं. भरपूर रिकामा वेळ घालविला पण परत मुम्बईला जायला मन तयारच होत नव्हते. अनिताशिवाय उभे आयुष्य घालविणे हा विचारच सहन होईना. सुन्न मनाने हॉटेलवर पोहोचलो. भकास व दिशाहीन वाटू लागले. रात्रभर अनेक उलटसुलट विचारांचे काहूर माजले. आता ती कुठे असेल, लग्न तर झाले नसणार ना, कशी दिसत असेल, माझी तिला आठवण येत असेल का. एकदा वाटायचे ती आपल्या संसारात रमलेली असेल आपण का तिचा उगाच शोध घ्यायचा.

अशाच रिक्त व उद्विग्न मनाने पहाटेच कारवारच्या रविंद्रनाथ टागोर बीचवर जाऊन बसलो. आसपास लोकही जास्त नव्हते. एरव्ही फेसाळलेला, रुद्रावतारी असा समोरचा विशाल सागर शांत होता. गर्दी, गोंगाट नसल्याने त्या पहाटेच्या निशब्द वातावरणात माझे मन शुन्यात विलीन झाले होते. थोड्याच वेळात सकाळच्या कोवळया उन्हाने बीचवरची वाळू उजळून निघाली. वाळूवरच्या लाटांकडे मी एकटक पहात बसलो. चित्तवृत्ती शांत झाल्या. मी कोण, कुठला, कुठे आलो हे सारे विसरून गेलो.

इतक्यात हातात पुस्तक घेतलेली एक गोरीपान तरुणी लगबगीने माझ्याकडे आली आणि जवळजवळ ओरडलीच, " तुम्ही गडावरचे आमचे सायंस सर ना? " मी ताडकन उठलोच, आणि दुसऱ्याच क्षणी तिने माझा हात हातात घेत मला जवळ जवळ मिठीच मारली. काय होते आहे मलाच समजेना, सगळाच प्रकार अनपेक्षित आणि आश्चर्यकारक. मी पुरता गोंधळून गेलो. क्षणात तिचे डोळे अश्रूंनी डबडबले.

माझ्या समोर माझी अनिता उभी होती. आता मात्र मी तिला जवळून पाहिलं. शांत सागराच्या आणि उगवत्या सूर्याच्या साक्षीने आमची अशी पुनर्भेट होईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. ती पूर्वीपेक्षाही सुंदर पण प्रौढ वाटली. तजेलदार चेहरा, सरळ नाक, काळेभोर डोळे, खूपच तडफदार आणि स्मार्ट व्यक्तीमत्व. मला तर काय बोलावे हेच सुचेना. पण अनिता मात्र बेंचवर माझ्या शेजारी बिनधास्तपणे मला बिलगून बसली आणि तिने पूर्वीसारखीच बडबड सुरू केली. मी मात्र हरविलेली दिव्य शक्ती मिळाल्याच्या आनंदात तिच्या खांद्यावर हळूवारपणे हात टाकुन तिची कहाणी ऐकू लागलो.

" त्या वर्षी मी पहिल्यांदाच दिवाळीच्या सुट्टित बाहेरगावी गेले होते आणि परत येताच तुम्हाला हरवून बसले. तुम्ही कुठे आणि का गेलात हेच समजेना. मी खूप दिवस तुमची वाट पहात होते आणि नतर अत्यंत निराश आणि हताश झाले. तरीही तुम्ही नक्की येणारच या आशेवर पुढची वाटचाल करीत राहिले. तुम्हाला माहित आहेच मला केमिस्ट्री खूप आवडायची. मी एम एस्सी तर केलीच पण केमिस्ट्रीतच पी एच डी ही केली. सतत तुमचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला व भरपूर ज्ञान मिळविण्याची जिद्द बाळगली. आजपर्यंत यशस्वी प्राध्यापिका म्हणून नव्हे तर "तुमची अनिता " म्हणूनच दिवस मोजत राहिले. आणि आज तुम्ही देवासारखे भेटलात. मला सर्वस्व मिळाले."

मी पुन: पळून जाऊ नये या हेतूनेच जणू ती माझा हात हातात धरूनच बोलत होती.

"सर, तुम्हाला शोधण्यासाठी, तुमचा पत्ता मिळविण्यासाठी मी बऱ्याच शिक्षकांना व मैत्रिणींना भेटले, पण उपयोग झाला नाही. तरीही मला नक्की विश्वास होता की तुम्ही कधी ना कधी भेटणार. खूप अडचणी आल्या, कठीण प्रसंग आले, लोकांची, नातेवाईकांची बोलणी खावी लागली, माणसे दुरावली. पण मी ताठ राहिले. तुमच्यायोग्य होण्यासाठी मी शिकत राहिले. माझ्याकडे मीच काढलेला तुमचा फोटो होता. त्या फोटोकडे पाहूनच मला प्रेरणा मिळत होती. "

तिची कथा ऐकून माझा कंठ दाटून आला. मोठ्या दिव्यातून तिने वाटचाल केली होती. तिच्या माझ्यावरच्या श्रध्देचा मला अभिमान वाटला. तिच्या सुखासाठी कांहीही त्याग करायची माझ्या मनाची तयारी झाली.

सहजगत्या आम्ही चालू लागलो, मधली वर्षे जणू नाहीशी झाली. तिने मला आपल्या घरी नेले. ती आईबरोबर एका बंगल्यात रहात होती, तिचा भाऊही जवळच रहात होता. आम्हाला पाहून तिची आई बाहेर आली, मला तिने बरोबर ओळखले, मी वाकून नमस्कार केला आणि आक्काच्या आठवणीने लगेच माझ्या डोळयात पाणी साचले. मला त्या आईसारख्याच वाटल्या. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. माझी हकीकत ऐकून त्यांनाही वाईट वाटले. आम्हा तिघांनाही नक्की वाटले की “ It’s never too late to mend. “

अनिता आणि तिच्या आईंना माझ्याकडे मुम्बईला कायमचेच येण्याचे मनस्वी आमंत्रण देऊन मी त्या दोन कणखर आणि आदर्श महिलांचा निरोप घेतला.



# कठीण समय येता

नेहमीसारखा मी आठ वाजता क्लासवर पोचलो. पाऊस तसा बेताचाच होता. नंतर मात्र तो खूप वाढला. पण मला त्या एसी रूममधे काहीच जाणवले नाही. माझे लेक्चर चालू असता कुणीतरी दरवाजा ठोठावला, मी बाहेर आलो, पाहतो तो शंकर ( आमचा शिपाई ) एकदम ओरडलाच,

" सर, मुलांना लवकर सोडून द्या, गाड्या बंद होतील. "

बाहेर येऊन पाहतो तो सारा प्रलयच. जिकडे तिकडे पाणीच पाणी. एका विशिष्ट तालात पाऊस कोसळत होता. तांडवताल म्हणा हव तर. अक्षरश: कोसळत होता. ढगफुटीच होती ती. मी ताबडतोब क्लास थाम्बवला आणि लगबगीने स्टेशन ग़ाठले.

साचलेल्या पाण्यातून प्रवाश्यांच्या शोधात भरधाव धावणाऱ्या रिक्षांचा आवाज, हातगाड्यावर, टपऱ्यांवर पडणाऱ्या पाण्याचा आवाज आणि जवळच ठाणे स्टेशनवरच्या गर्दीगोंगाटाचा आवाज. अशाने वातावरणाला एक भयानकपणा आला होता. फलाटावर पोहोचलो तर पाय ठेवायला जागा नाही एवढी तोबा गर्दी. त्या गोंधळातच कर्कश आवाजात गाड्यांबद्दल निवेदन चालू होते.

" गाड्या अनिश्चित वेळेवर धावत आहेत. "

" ठाण्याच्या पुढे कल्याणकडे जाणाऱ्या गाड्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. "

ट्रॅकवर साचलेले पाणी पाहत असताच ही आकाशवाणी कानावर आली आणि माझे धाबेच दणाणले.

कांहीच सुचेना. त्या गर्दीगोंगाटात पर्यायी मार्गाचा विचार करतो आहे एवढ्यात कसे कुणास ठाऊक पण कल्याण लोकल स्टेशनात शिरत होती. जिवाचा आकांत करून गाडीत शिरलो

खरा पण असा अधांतरीच उभा होतो जणू, इतकी तोबा गर्दी. लोकल अगदी बैलगाडीच्या वेगाने कळवा, मुम्ब्रा ओलांडत दिव्याला कशीबशी पोचली. मनात गणित घातले, फक्त पाच मिनीटे आणि आलीच डोम्बिवली. पण बराच वेळ गाडी थाम्बलेलीच.

पुन्हा आकाशवाणी झाली, " डोम्बिवली स्टेशनात ट्रॅकवर पाणी तुम्बल्याने गाडी पुढे जाणार नाही. "

सूचना सम्पताच सगळे प्रवासी भाम्बावून दिवा स्टेशनवर उतरले. आणि क्षणात लोकल ठाण्याच्या दिशेने परत निघाली. आता मात्र सारे हवालदिल झाले.

" म्हणजे दुसरी लोकल तर येणारच नाही. "

तेवढ्यात बरेच लोक रिक्शा, टॅक्सीच्या शोधात धावले देखील. पण परतही आले.

" सगळे रस्ते पाण्याखाली असल्याने रिक्शाही अडकून पडल्या आहेत.. "

" पाऊस तर थाम्बायलाच तयार नाही. "

पाऊस एकाच वेगाने धो धो कोसळत होता क्षणाक्षणाला त्याचा वेग वाढतच होता. पर्यायी कुठलीच सोय नव्हती. स्टेशनवर थाम्बण्यात तर काहीच अर्थ नव्हता. सगळयांना घरच्या मुलाबाळांची काळजी लागून राहिलेली. अखेर आपापल्या छत्र्या, रेंनकोट सावरून डोम्बिवलीचे आम्ही प्रवासी ट्रॅकवरूनच घर गाठायचे ठरवून निघालो. अडला हरी---

पन्नास फुटावरचे कांही दिसत नव्हते ईतका धमाकेदार पाऊस. डाव्या बाजूला खाडीच्या पाण्याला भरती आल्याने केवळ दहा फुटावर ते अथांग पाणी ट्रॅकच्या उंचवट्याला धडकत होते. तर उजव्या बाजूला सबंध शेतजमीनीवर पाणी साठले होते. भयानक दृश्य. आम्ही ओळीने चाललेले दहा बारा लोक म्हणजे जणू रामाच्या सेतूवरून लंकेला निघालेली वानरसेनाच. फरक इतकाच की आम्ही छत्रीधारी होतो. दिवसाची वेळ होती म्हणून बरे.

मी पूर्णपणे भिजलेला. छत्री धरण्यात कांही अर्थच नव्हता. पायात नवीन घेतलेल्या पावसाळी सॅन्डल्स लागल्याने दोन्ही पाय रक्तबंबाळ. पण " थाम्बला तो सम्पला " अशी परिस्थिती. पाच सहा किलोमीटर चालता चालता पायाखालची खडी पाहून पाहून डोळेच

चक्रावले. कोपरच्या ब्रिजपुढे तर ट्रॅकवरच प्रचंड पाणी. त्यामुळे आम्ही सर्वजण कोपरगावातच शिरलो. कमरेईतक्या पाण्यातून कसेबसे घर गाठले. घरातल्या लोकांचा जीव भांड्यात पडला. पण तीन पायऱ्या चढून घराच्या उम्बरठ्यापर्यंत पोचलेले पाणी पाहून मात्र सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले.

संध्याकाळपर्यंत पाणी ओसरू लागले आणि लोकांनी टीव्हीवर बातम्या पहायला सुरूवात केली. इथल्यापेक्षा मुम्बईत जास्तच हाहाकार माजला होता. इकडे ठाण्यापर्यंत आणि तिकडे नवी मुम्बईपर्यंत सर्व मुम्बापुरी जलमय झाली होती. भरतीचे पाणी शहरात शिरत होते. सगळेच जीवन ठप्प झाले होते. डोम्बिवलीच्या प्रत्येक घरातील एकेक माणूस तरी मुम्बईत अडकून पडला होता. खरोखर युद्धजन्य परिस्थिती. बऱ्याच ठिकाणचे फोन व मोबैल्स बंद पडले होते. सम्पर्क होत नसल्याने आणखी भीतीचे वातावरण.

अंधार पडला तसा पावसाचा जोर पुन्हा वाढला. साचलेले पाणी वेगाने वाढू लागले. आम्ही तळमजल्यावर असल्याने जास्तच भीती. रात्रीचे अकरा वाजले असतील, मी बाहेर जाऊन पाहतो तो पाणी उम्बरठयाला टेकलेले. लाईट जातील म्हणून तयारी करणार तोपर्यंत पाणी सर्व खोल्यात शिरले. ब्रम्हांड आठवले, पाणी तर थाम्बवू शकत नव्हतो. असहायतने डोक्यात काहूर माजले.

लगबगीने आम्ही खाली असलेले सामान, पेपर, पुस्तके, फाईल्स, फोटो, महत्वाची कागद्पत्रे ईत्यादी शक्य तितक्या वर काढून ठेवायला सुरूवात केली. पाणी मात्र वेगाने चढतच राहिले. एवढ्यात भालेकरांचा सचिन धावतच घरात शिरला आणि ओरडला, ---

“ काका उठा, पाणी खूपच वर आले आहे, आम्ही सर्वजण जमेल तितके सामान वरच्या मजल्यावर नेऊन ठेवतो. तुम्ही वर आमच्या घरी चला. कपडे वगैरे घ्या, वेळ नाही आता “

इतके सांगूनच तो गेला नाही तर समोरचा गोविंदन, वरच्या दणायतांची सायली, गोपालकृष्णन आणि रामन यांची मुले व ईतरांना घेऊन आला. त्याच्या सोनल आणि मीनल या बहिणी मात्र कुठे दिसल्या नाहीत. मुले माणसे साखळी करून जिन्यावर उभी राहिली. वीज तर कधीच गायब झाली होती. ठिकठिकाणी मेणबत्त्या लावल्या. व सर्वांनी आमचे, धारूळकरांचे, गोविंदनचे व पिल्लैचे सर्व महत्वाचे फर्निचर व मौल्यवान सामान पटापट वर न्यायला सुरूवात

केली. तोवर घरातल्या इतर सर्व वस्तू पाण्यावर तरंगायला लागल्या. बऱ्याचशा हलक्या व छोट्या वस्तू वाहूनही गेल्या. खूप खूप वाईट वाटले. पण इतकी माणसे मदतीला धाऊन आल्याने आम्हालाही हत्तीचे बळ आले होते.

सचिन, आमची हेमा, सायली व ईतर होतकरू मुले यांनी प्रसंगावधान राखून सावधपणे धडपड केली. तळमजल्यावरच्या चार कुटुम्बांना वरच्या मजल्यावरच्या कुटुम्बांनी सामावून घेतले. आम्हाला व धारूळकरांना भालेकरांनी आपल्याकडे नेले. पाण्याच्या दाबाने दरवाजे कायमचे बंद होतील हे सचिनने बरोबर ओळखले व प्रथम माणसांची सोय केली. सामान वर कुठे कुठे ठेवले गेले कुणालाच समजले नाही. पाण्याची पातळी वर वर चढत असलेली पाहण्यात आणि दु:खाच्या खाईत शिरण्यातच रात्र कधी सम्पली समजलेच नाही. तळमजला पूर्ण पाण्याखाली गेल्याने सगळी वीस कुटुम्बे वरच अडकून राहिली.

उजाडल्यानंतर दु:खाला खरी वाचा फुटली. चौकशी सुरू झाली की आपल्या सोसायटीतल्या लोकांपैकी कोण कोण बाहेर मुम्बईत अडकून पडले आहेत.

“ सायली, तुझे मम्मी पप्पा यायला निघालेत का?”

“ नाही, नाही, ते माझ्या मावशीकडेच थाम्बलेले आहेत. काळजी करू नको असे म्हणाले. ”

“ पिल्लै, धारूळकर आणि गोविंदन तर केंव्हाच आले आहेत. ”

“ पण सवदींचे काय? त्यांचे घर तर बंदच आहे. ‘”

“ अहो ते सर्वजण कधीच त्यांच्या भावाकडे कोपरगावात गेले. ‘”

तेंव्हा समजले की भालेकर वहिनींच्याच दोन मुली, सोनल आणि मिनल, मुम्बईत अडकलेल्या होत्या. आम्ही सर्वांनी अगदी अगत्याने विचारले तेंव्हा मात्र वहिनींच्या डोळ्यात पाणी तरळले. आम्ही सर्वजणांनी फक्त आपापल्या संकटाचाच विचार केला होता. आता मात्र आम्ही सगळेच चिंताग्रस्त झालो. आम्हाला लगबगीने आसरा देत असता त्यांनी स्वत:च्या मुलींची काळजी बाजूला ठेवली होती. त्यांनी इतकचं सांगितलं की संध्याकाळी त्या दोघींचा निरोप आला होता की त्या मावशीकडे जाणार आहेत. त्यानंतर मात्र कांही सम्पर्कच झाला नाही. आम्ही सर्वांनी त्यांचं सांत्वन केलं, धीर दिला आणि मदतीचं आश्वासनही दिलं.

सायली आम्हा सर्वांना मदत करीत होती खरी पण तिचे आई बाबा मुम्बईत अडकले होते. त्यांचा मात्र सुरक्षीत असल्याचा फोन आला होता. मी स्वत: केवळ जवळ असल्याने धडपडत घरी पोचलो होतो. म्हणजे सोसायटीतली सर्व चाकरमानी मंडळी सुखरूप घरी पोचली होती. सर्वांचे लक्ष फक्त भालेकर वहिनींच्या दोन मुलींवर केंद्रीत झाले. आमच्या मनावर फार मोठे दडपण आले होते. मनोमनी सर्वजण त्यांच्या सुरक्षेची प्रार्थना करीत होतो. भयानक हुरहुर लागून राहिली. दिवसभर पाऊस तसा कमीच होता पण पाण्याची पातळी कांही कमी होत नव्हती. पूर्ण तळमजला पाण्याखाली असल्याने बाह्य जगाशी आमचा सम्पर्कच तुटला होता.

नगरपालिकेचे किंवा कोणत्यातरी राजकीय पक्षाचे लोक मदतीला येतील, नाहीतरी शिवसेनेचे लोकतरी येतीलच या आशेवर आम्ही होतो. पण कोणत्याही सामाजिक वा शासकीय संस्थेने विचारपूसही केली नाही. पाणी साचण्याआधीही कोणी सावधगिरीची सूचना दिली नव्हती. धन्य आपला समाज आणि धन्य आपली लोकशाही !!! राज्यशासनानेही कोणती कारवाई केली नाही. एरव्ही देशसेवेचा टेम्भा मिरविणारी आणि आपल्या समाजकार्याचा ढोल वाजविणारी रोटरी, लायंस, इन्नरव्हील इत्यादी क्लबची मंडळी कुठल्या पाण्यात बुडालेली होती देव जाणे. पोलीस आणि होमगार्ड यांचाही कुठे पत्ता नव्हता. ते तर गरीब बिच्चारे, त्यांच्याही कांही जणाच्या घरात पाणी शिरले असेल. कुणी कुणाचा वाली नाही.

रात्र झाली तशी निराशा वाढतच गेली. पण आम्हाला काळजी आणि कौतुकही वाटले ते भालेकरवहिनी आणि भालेकरांचे. दोन कुटुम्बांना त्यानी पूर्ण विश्वासाने आसरा दिला, चहा नाश्ता, जेवण यात कुठे कमी पडू दिले नाही, कांही कुरबुरही केली नाही. धन्य ते दाम्पत्य, नाहीतर आम्ही सहा सात जण कुठे जाणार होतो. मी आणि धारुळकर खिडकीशी बसून रेल्वेब्रिजला थडकलेल्या पाण्याच्या पातळीकडे दिवसभर पहात बसलो होतो. सर्वांच्या मनात एकच विचार होता, सोनल आणि मिनलचा. त्या सुखरूप येवो हीच आमची प्रार्थना होती.

दोन रात्री एक दिवस गेला नी दुसरा दिवस उजाडला तरी कांही फरक पडला नाही. कांहीचे फोन सुरू झाल्याने बाहेरच्या बातम्या कानावर येऊ लागल्या.

“ मागच्या इमारतीतल्या जोशी मॅडमचे मिस्टर परतले नव्हते व ठावठिकाणाही समजला नाही म्हणे” एक बातमी

“ समोरच्या चाळीतले तीस चाळीस लोक वर स्टेशनवरच थाम्बलेले आहेत.“ गोविंदनने स्वत: पाहिले होते.

आम्हा सर्वांना चिंता होती ती सोनल आणि मिनलची. त्यांच्याशी सम्पर्कही होत नव्हता. भालेकर वहिनींचा चिंताग्रस्त चेहरा पाहून आम्ही विलक्षण टेंशन मध्ये होतो. सारेच हवालदिल.

कुणीतरी बातमी आणली, ” बदलापूरच्या धरणाचे सर्व गेट्स उघडल्याने तो महापूर आला होता. शिवाय समुद्राची दोन वेळा भरती. ”

“ समोरच्या चाळीतील चाळीस पन्नास माणसे दोन दिवसापासून कोपररोडच्या वरच्या स्टेशनवर बसून आहेत. ”. बदलापूरपासून कल्याणपर्यंतच्या शेकडो लोकांना पुराचा तडाखा बसला होता. प्रचंड नुकसान व जीवीतहानी झाली होती. योग्य सूचना योग्य वेळी दिली गेली असती तर बरेच कांही वाचू शकले असते. ” पण लक्षात कोण घेतो. ”

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सचिननेच बातमी आणली, ” पाणी ओसरू लागले आहे पण सावकाश. ”

थोडा जिवात जीव आला पण त्या रात्रीही आम्ही अधांतरीच.

उजाडताच मात्र हालचालींना वेग आला. पहिलेच दृश्य आम्ही वरून पाहिले आणि प्रचंड शोककळा सर्वत्र पसरली. मागच्या जोशी मॅडमच्या दोन जावयांनी जोशी साहेबांचे शवच ॲम्बुलंन्समधून खाली उतरवले. शोकाकूल गर्दी जमा झाली तेंव्हा समजले की त्यांनी ते शव अक्षरश: शवागारातून आणले होते. मुम्बईत प्रचंड प्राणहानी झालेली होती. हळू हळू मुम्बईहून अडकलेली मंडळी येऊ लागली होती.

आम्हा सर्वांन्चा जीव टांगणीला लागला होता. भालेकर दाम्पत्याचा अखेर बांध फुटला. आम्ही सर्वांनी परोपरीने त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला पण आतून आमचाही धीर सुटत चालला होता. एक भयानक सस्पेंस दाटलेला. तशात आम्ही सर्वजण खाली रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून येणाऱ्या लोकांचे स्वागत करीत होतो.

अचानक एक आनंदाचा धक्का बसला. एका रिक्शातून सोनल आणि मिनल उतरून धावत आमच्या दिशेने आल्या. नंतरचा आनंदसोहळा अवर्णनीयच होता. भालेकर वहिनींनी दोन्ही मुलींना घट्ट मिठी मारली, त्यांचे आनंदाश्रू थाम्बवणे अशक्यच होते. सर्वांनाच गहिवरून

आले. फार मोठ्या संकटातून आम्ही सुखरूप बाहेर पडलो होतो. आमच्यापुरते तरी, ” All is well that ends well” असेच होते.

नवीन जोमाने आम्ही कामाला लागलो. तळमजल्यावर पाय ठेवता येणार नाही इतका चिखल. तरी नुकसान किती झाले हे पहाण्याची उत्सुकता. शेवटी आम्ही चारही कुटुम्बियांनी खाली जाऊन साफसफाई करायचे ठरविले. आमचे तुमचे कांहीही न म्हणता सर्वांनी मिळून चारही घरे पावसाच्या पाण्यानेच स्वछ्छ धूऊन काढली. संकट्विमोचनाचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर झळकत होता.

# अनोखे पर्यटन

डिसेंबर अखेरच्या थंडीने आम्ही सारेच कुडकुडत होतो म्हणून तर गाडी थाम्बवून चहासाठी उतरलो. गरम चहा पोटात जाताच सर्वांना तरतरी आली.

“ आपण कुठपर्यंत आलो आहोत आता?” एकाने विचारले.

ड्रायव्हर म्हणाला, :” आपण आता पटणी टॉपजवळ आहोत. ”

“म्हणजे श्रीनगरला पोचायला संध्याकाळच होणार. ” मी अंदाज व्यक्त केला.

“ तुम्ही कुठून आलात?” एका तरूणाने जवळ येत मला विचारले.

“ मुम्बईहून. “

दुसऱ्या तरूणाने कान टवकारले आणि मला म्हणाला, “ म्हणजे तुमचा प्रवास खूपच लाम्बचा झाला”.

मी लागलीच खुलासा केला, ” येताना वाटेत मी डलहौसीचा पाच दिवसाचा ट्रेक करून आलो आहे. त्यामुळे माझाही तुमच्यासारखा जम्मूहूनच प्रवास सुरू झाला.. ”

“ मुम्बईत एवढी थंडी नसेल ना?” त्या तरुणाने विषय बदलला.

“ छे एवढी कुठली, तिथे आताही स्वेटर घालायची गरज भासत नाही. ”

त्या दोघा तरूणांना मुम्बईबद्दल खूप कुतूहल असल्याचे जाणवले.

आम्ही पुढे निघालो खरे पण माझ्या मनात मात्र डलहौसीच्या धमाल ट्रेकचाच विचार सुरू झाला.

डलहौसीच्या हिवाळयातल्या ट्रेकची जेंव्हा बातमी समजली तेंव्हा लगेच माझा निर्णय पक्का झाला होता. हिमालयातले मी केलेले तीन चार ट्रेक हे एप्रिल्-मे च्या उन्हाळयातले होते. आता हा ट्रेक ऐन थंडीतला आणि तोही थंड हवेच्या ठिकाणी, कल्पनेनेच अंगावर काटा आला. दुसरे कारण म्हणजे डलहौसी आणि पठाणकोट हे तर काश्मिरच्या उम्बरठ्यावरच. दोन तीन दिवसाची मार्जिन ठेवली तर सहज नंदनवनाला भेट देण्याचा पुन्हा एकदा योग येऊ शकतो. ठरले, निर्णय पक्का झाला.

वर्ष अखेरचा दिवस आणि अस्मादिकाची स्वारी डलहौसीत दाखल. नववर्षाचेच नव्हे तर नवशतकाचे स्वागत करण्यासाठी साठ सत्तर ट्रेकर्स 2-3 डिग्री तपमानाच्या थंडीत शेकोटीभोवती जमलेले. फक्त दोन डोळे सोडून सारे शरीर आच्छादलेले. मध्यरात्री हॅपी न्यू ईयर्सच्या जल्लोष्यात सर्वांनी गरमागरम सामोसे आणि बोर्नव्हीटाचा आस्वाद घेतला आणि पहाटे ट्रेकसाठी निघणारे आम्ही लगबगीने हॉस्टेल गाठले. एक केवळ अविस्मरणीय प्रसंग अनुभवला.

पहाटे पहाटे चहा घेऊन अर्धवट झोपेतच आम्ही मार्गी लागलो.

एका नवख्या ट्रेकरने विचारले, " आपला किती ठिकाणी मुक्काम होणार आहे?'

“ आपण काला टोप, खजियार आणि चम्बा अशा तीन ठिकाणी मुक्काम करणार आहोत. आणि बरोबर पाचव्या दिवशी आपण बेसकॅंपला परतू. “ मी ट्रेकची सविस्तर माहिती मिळवली होती.

पहिला मुक्काम अजून यायचाच होता इतक्यात भर दुपारी बारा वाजता चमत्कारच झाला. थोडेसे काळवंडून आले आणि लगेचच आकाशातून बर्फवृष्टी सुरू झाली. एक अवर्णनीय दृश्य पहायला मिळाले. बर्फाचे फ्लेक्स असे हवेत तरंगत तरंगत अलगद जमिनीवर पडायचे. कांही मिनिटातच जमिनीवर पांढरेशुभ्र कार्पेट घातल्यासारखे वाटले. आजवरच्या ट्रेकिंगमधला हा एक विलक्षण चितथरारक अनुभव. बर्फ अंगावर घेण्यात कोण चढाओढ. तासभर आम्ही देहभान हरपून बर्फात खेळत होतो. फोटो काढण्याचीही स्पर्धा लागली. तशात थंडगार झालेले पॅक लंच आम्ही कधी खाल्ले समजलेच नाही. माझ्या मनात त्रैराशिकाचे गणीत मांडणे सुरू होते. इथेच इतकी थंडी तर काश्मीरच्या खोऱ्यात काय असेल!

पुढे खजीयार चम्बा असा मुक्काम करून प्रचंड उत्साहात बेस कॅम्पला पोहोचताच परतीच्या प्रवासाची पॅकींग सुरू झाली. मी परतीच्या प्रवासाची तारीख हेतुपुरस्सर चार

दिवसाची मार्जिन ठेवूनच केली होती. माझी योजना होती की जम्मूहून सरळ श्रीनगरला जायचे आणि हिवाळयातल्या काश्मीरची सफर करायची. म्हणून काश्मीरला येण्याबद्दल मी साथिदारांना विचारले तर सर्वांनी मला मूर्खातच काढले.

शेवटच्या नाश्त्यासाठी आम्ही सर्व एकत्र बसलो असता मी विषय काढला.

" मंडळी, माझे एक प्रपोजल आहे, ऐका आणि निर्णय सांगा. इथून काश्मीर खूपच जवळ आहे, तर आपण दोन दिवसात ती ट्रिप करूया का? मस्त मजा येईल. "

" अहो तेथे अतिरेक्यांनी नुसता धुमाकूळ घातला आहे. " जोशीने लगेच मतप्रदर्शन केले.

"इतकच नाही, वरचेवर बॉम्बस्फोटपण होताहेत. कालच्या पेपरातच बातमी होती. "

'" ते राहूद्याहो, प्रचंड थंडी तर आहेच पण भयानक बर्फवृष्टीही होते आहे त्याच काय."

" कशाला पायावर धोंडा टाकून घ्या. ट्रेक मस्त झाला आहे आता गपचूप घरी जाऊ."

असे एकेकांचे बोल ऐकून मी निमुटपणे पॅकिंग सुरू केले.. माझे तर ठरलेलेच होते. याआधी एकदा काश्मीर पूर्ण पाहिलेले असूनही मला त्या नंदनवनाच्या सौंदर्यात आकंठ डुम्बायचे होते. भरपूर फोटो काढायचे तर होतेच पण बर्फातही खेळायचे होते. या अरसिक लोकांना काय सांगणार.

शेवटी पठाणकोटहून पांगापांग झाली आणि मी जम्मू गाठले. क्लोकरूममध्ये अवजड सामान ठेवले आणि मी बस स्टॅन्डवर पोचलो. रांगेने सुमो उभ्या होत्याच, मिळेल ती सुमो पकडून मी श्रीनगरच्या दिशेने कूच केली.

तीनशे किलोमीटर्सच्या जम्मू श्रीनगर रोडच्या दोन्ही बाजूला ठराविक अंतराने सैनिक खडा पहारा देत उभे होते. प्रवासी वाहनांच्या सुरक्षेकडे जातीने लक्ष पुरवले जात होते. माझ्या मनात चलबिचल सुरू झाली. दबक्या सुरात लोकही अतिरेक्यांच्या कारवायांबद्दल बोलत होते. वातावरणातच जणू काय दहशत होती. राहून राहून माझ्या मनात प्रश्न उभे राहू लागले, आपला काश्मीरचा निर्णय चुकला तर नाही ना. परत फिरणे तर मुश्कीलच. जागरूक राहून सतत सभोवार नजर ठेऊन माझा प्रवास चालू ठेवला. मला वाटते पट्नीटॉपजवळ कुठेतरी आमची सुमो चहासाठी थाम्बली. सारे आठ नऊ जण पाय मोकळे करण्यासाठी खाली उतरलो. आपापसात

बोलाचाली होत होत्या, विषय श्रीनगरचाच. थंडी खूप असेल का, व्यवहार सुरळीत चालू असतील का, . वाहनांची ये जा तर चालूच होती. आमच्या ग्रुपमधलेच दोन तरूण माझ्याकडे आले व माझी नेहमीसारखी विचारपूस सुरू केली. कुठून आलात, काय काम काढलतं वगैरे. मी मुम्बईचा आहे हे समजताच त्यानी अधीकच जवळीक साधली. माझे चहाचे पैसेही त्यांनीच चुकते केले. ते राहणारे श्रीनगरचेच होते, पण त्यांच्या बोलण्यावरून समजले की कामानिमीत्त ते जम्मूला आले होते.

श्रीनगरला पोहोचायला चार वाजले. नव्या साथिदारांना हॉटेलांची चांगली माहिती होती. अशा अनोळखी तरुणांशी जास्त जवळीक करू नये असे वाटत होते, पण वेळ व पैसाही वाचेल म्हणून त्यांच्या मदतीनेच दाल लेकच्या बाजूला एक हॉटेल शोधले. ऑफ सीझन असल्याने आठ नऊशे ची खोली मला अडीचशेतच मिळाली. मी खूष झालो. दोघांनी हॉटेल सारे पाहून घेतले आणि आपले विचार मांडले.

ते म्हणाले, " आज तुम्ही थकल्याने विश्रांती घ्या. हॉटेल तसे चांगले आहे. पण उद्या आमच्या ओळखीच्या एका बंगाली माणसाच्या हॉटेलमध्ये शम्भर सव्वाशेमध्ये तुम्हाला खोली मिळवून देऊ".

मला थोडी शंकाच आली, यांचे कांही कमिशन तर नसेल. ते निघाले तेंव्हा साधी ओळख तर हवी म्हणून मी त्याना नाव विचारले.

वयाने मोठा होता त्याला प्रथम विचारले, " मैंने आपका नामभी नही पूछा, '

" गियासुद्दिन" थोडासा संकोच करीत तो म्हणाला. लहान होता तो अझीझ महम्मद.

त्यांची नावे ऐकून मी हादरलोच. ते मुस्लीम असतील असे मला वाटलेही नव्हते. हे इथलेच नागरिक आहेत की सीमेपलीकडून इथे आलेले आहेत कसे कळणार. ते माझ्याशी इतकी जवळीक का करत आहेत काही समजायला मार्ग नव्हता. वास्तविक मी दोन दिवसासाठी आलेला अनोळखी प्रवासी. केवळ तोंडओळख. इतर प्रवासी आपापल्या वाटेने गेले तसे हे का गेले नाहीत.

चांगले दोन कप गरम चहा घेऊन गावातून फेरफटका मारण्यासाठी मी बाहेर पडलो. सर्व व्यवहार सुरळीत चालू होते. पण एका अनाकलनीय भितीचे सावट शहरावर पडल्याचे जाणवत होते. रस्ते रिकामे वाटत होते. अंधार होताच दुकाने बंद होऊ लागली. मला

जोशीअभ्यंकर खूनमालिकेनंतरचे पुणे शहर आठवले. हॉटेलवर परतताच त्या साथीदारांची आठवण झाली. पुन: शंकेने डोके वर काढले. मुम्बईबद्दल त्यानी बरेच प्रश्न विचारले होते त्याची आठवण झाली. गुंतागुंत वाढत चालली. या आठ दहा तासात त्यांनी माझी काळजीही खूप घेतली होती. माझ्याकडून त्यांची कांहीतरी अपेक्षा असणार याची खात्री वाटली.

माझ्या पैशावर तर त्यांचा डोळा नसेल ना. की माझ्याकडून मुम्बईची काही माहिती त्यांना हवी आहे. की मलाच ब्लॅकमेल करून पैसा उकळायचा आहे. पण मी तशी सावधगिरी बाळगूनच होतो. मी माझा पेशा, पत्ता किंवा कुटूम्ब्बाची माहिती वगैरे कांही त्यांना दिलेली नव्हती. कांहीही असो आता त्यांच्याशी सम्पर्क ठेवायचाच नाही. आपण एकटेच फिरू. तशी कांही भिती नाही. प्रवाश्यांना ते त्रास देत नाहीत असे मी ऐकले होते. पण सर्वत्र अतिरेकी कारवायांचा पगडा जाणवत होता.. लोक इथे भीती आणि दडपणाखालीच वावरत होते. मोठी अडचण म्हणजे अतिरेकी कसे दिसतात, इथे शहरात काय काम करतात, त्यांचा अंतीम हेतू तरी काय असतो याची सर्वसामान्य जनतेला काही कल्पनाच नसते. केवळ ऐकीव माहितीवर आपण शेरे मारत असतो. शेवटी माझ्या मनात एक सुखदायक विचार आला. उगाच आपण राईचा पर्वत करीत आहोत. उद्या कदाचित ते येणारच नाहीत.

सकाळी सारे आटपून मी निघण्याच्या तयारीत होतो. दरवाजा उघडताच समोर गियासुद्दिन आणि अझीज उभे. भरपूर गरम कपडे घातल्याने ते पक्के कश्मीरी दिसत होते.

“ सर झोप लागली का? हीटर वगैरे लावला होता का?” गियासुद्दिनने चौकशी केली.

अझीजने विचारले, “ सकाळचा नाश्ता झाला वाटते. ” मला त्यांचे अस्तित्वच नकोसे वाटले.

कडाक्याच्या थंडीत त्यांचे चेहेरे निर्वीकार झाले होते. माझ्या मनात प्रचंड घालमेल झाली, त्यांना आत घ्यावे की नको, आज कुठे जायचेच नाही असे सांगून टाकायचे का. भीतीचे खरे कारण म्हणजे वरच्या मजल्यावरचे एक दोन प्रवासी सोडले तर हॉटेलमध्ये कुणीच नव्हते. मी अशा विचारात असतानाच ते आत आले. त्यानी आपला प्लॅन सांगितला.

ग़ियासुद्दिन म्हणाला, " पहिल्यांदा आपण तीनही मुघल गार्डंन्स पाहू पण टॅक्सीच्या ऐवजी सिटी बसमधूनच फिरू म्हणजे कमी पैशात काम होईल व संध्याकाळी दाल लेकमध्ये शिकाऱ्यातून फिरू. '"

मला खूप बरे वाटले, पैसे बरेच वाचतील आणि निवांतपणे बघता येईल. आम्ही चष्मेशाही गार्डनमध्ये पोचताच थोड्या वेळात येतो असे सांगून गियासुद्दिन गायब झाला. पुन: माझ्या मनात शंका डोकावली. हा कुणाला घेऊन तरी येत नसेल ना. पण आम्ही बाहेर पडत असतानाच तो आला. निशांत नंतर आम्ही शालिमार गार्डन मध्ये शिरत असता अझीज गायब झाला. त्यांच्या हालचालीत कांहीतरी संशयास्पद होते.

दालगेटकडे आलो तर शिकाऱ्याचे अनेक नावाडी धावत आमच्याकडे आले. प्रत्येकाने आम्हाला वेगवेगळ्या ऑफर्स दिल्या. कुणी म्हणाला, एका तासात पूर्ण दाल लेक दाखऊ, कुणी म्हणाला, तुम्हाला चार चिनार व हजरतबाल मशीदही दाखवू. तेवढ्यात गियासुद्दिनने एक शिकारा ठरवला, तो बहुतेक त्याच्या ऑळखीचा असावा. एरव्ही सात आठशे रुपयालाही भीक न घालणारे हे शिकारावाले दीडशे मध्येच तीघांना तासभर न्यायला तयार झाले. त्यांचे व्याकूळ आणि निराश चेहेरे पाहून मला खूप वाईट वाटले.

सबंध काश्मिरचे जीवनच टूरिझमवर विसम्बलेले. कोणते उद्योगधंदे नाहीत, मोठा व्यापारही नाही. नोव्हेम्बर पासून फेब्रुवारीपर्यंत प्रवासीही मिळत नाहीत. शिकारे सारे नांगरलेले, हॉटेल्स नि:शब्द, टॅक्सीवाले चातकासारखे पॅसेंजरची वाट पाहणारे, शाल गुरफटून मुकाट्याने बसलेले दुकानदार, -- सर्वच कसे भकास. अशा या डळमळत्या अर्थव्यवस्थेवर पुन: अतिरेकी गुंडांची झडप. लोक हवालदिल झालेले. दोन चार दिवसासाठी नंदनवन पहायला आलेल्या प्रवाश्यांना काय समजणार इथल्या लोकांच्या व्यथा. नंदनवनातले हे शापित गंधर्व. इकडे धर्माचे राजकारण तिकडे घुसखोरीचे दबावतंत्र. जनतेची मात्र " ना घरका ना घाटका " अशी अवस्था. " आई जेऊ घालीना, बाप भीक मागू देईना", अशाने बावरलेली आणि हतबल झालेली जनता. कांही नागरिक तर निराश्रीत म्हणून जम्मूच्या छावणीत रहात होते.

दाललेकमधल्या सफरीचा शेवटचा टप्पा होता जगप्रसिद्ध हजरतबाल मशीदीचा. बोट धक्क्याला लागताच गियासुद्दिन व अझीज मोठ्या उत्साहात मशिदीकडे निघाले. त्यांच्या

मगोमाग मी निघालो खरा पण माझ्या जीवाची घालमेल होत होती. माझ्या जोडीला कुणीच नसल्याची भावना मला पोखरू लागली.

हे समजूनच की काय गियासुद्दिन मला म्हणाला, " ही खूप प्रसिद्ध व पवित्र मशीद आहे, पण इथे सर्वांना प्रवेश आहे. आप फिक्र मत करो, हमारे साथ साथ चलो. "

प्रचंड प्रार्थनामंडप ओलांडून आम्ही गाभाऱ्यात पोहोचलो. एका वयोवृद्ध मौलवीने आमचे स्वागत केले. त्यांनी तिथल्या प्रथेची थोडक्यात कल्पना दिली. " तिथे वरच्या मजल्यावर जाड काचेच्या पेटीत हजरत पैगम्बर याचा पवित्र केस जपून ठेवण्यात आला आहे. ती पेटी वर्षातून दहा वेळा भक्ताना दर्शनासाठी ठेवली जाते. मक्केनंतरचे हे पवित्र स्थान असल्याने जगभरातून लोक दर्शनासाठी येतात. ऊरूस असताना लाखो भाविक इथे नमाज अदा करतात. " तो अभिमानाने सारे सांगत होता. पण माझी नजर सभोवार भिरभिरत होती.

अखेर आम्ही होटेलवर सुखरूप पोहोचलो. लगेच त्यांनी आपला प्लॅन सांगितला.

" तुमच्या हाती आता एकच दिवस आहे, तेव्हा आपण हे हॉटेल आताच सोडू, आम्ही त्या बंगाली हॉटेल मालकाला सांगितलं आहे. तुम्हाला फक्त दीडशे रुपयात दीड दिवस राहता येईल. उद्या तुम्हाला खूप बर्फ पहायचा असेल तर आपण पेहलगामच्या ऐवजी गुलमर्गला जाऊ."

अझीजने आणखी भर घातली, " गंडोला चालू असेल तर खूप बर्फ असलेल्या डोंगरावर जाऊ. आम्हीही बरेच दिवसात अशी सफर केलेली नाही. बसेस नसल्याने आपल्याला टॅक्सीच करावी लागेल. पाहू कुणी ओळखीचा भेटतो का. "

माझ्यापेक्षा त्यांचीच तयारी जोरदार होती. त्यामुळेच मझ्या मनात चलबिचल होत होती.

लगेच आम्ही दुसऱ्या लॉजवर पोचलो. त्यांनी सांगितल्याप्रमणे मालक बंगाली बाबूच होता. शोम चतर्जी असे कांहीतरी नाव होते. यांच्या चांगलाच परीचयाचा होता. पण मुस्लीम नव्हता ही जमेची बाजू.

दुसऱ्या दिवशी पहाटे सहा वाजताच दोघे दारात उभे. मोठे स्वेटर्स, जॅकेट, मफलर वगैरेसह ते वेगळेच दिसत होते, जणू मारेकरीच. मी तर दचकलोच. पण लगेच स्वत:ला सावरलं. मीही भरपूर गरम कपडे अंगावर चढवू तयार झालो. पैशाची बिल्कूल काळजी करू नका असे सांगून प्रत्येकी 300 रुपये द्यायलाही ते तयार झाले. मला आणखी एक आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही निघालो तर वाटेत भरपूर चेकिंग. शेवटच्या वळणावर मोठी चेकिंग होती. प्रत्येकाला सही करावी लागे. त्यांच्या रजिस्टरवर मी पहिल्यांदा नाव लिहून सही केली. ती पाहून आनंदीत झालेल्या तिथल्या जवानाने विचारले, -----

"महाराष्ट्रातून आलात का? "

" हो, मुम्बईहून. तुम्ही कसं ओळखलं? "

" नावावरून. मीही मराठीच आहे. बेळगावच्या मराठा लाइट इनफंट्रीतून आलो आहे." तो अभिमानाने सांगत होता.

मीही सांगितलं, " मीसुध्दा बेळगावचाच आहे. माझा जन्म बेळगावचा. "

" हो का, साहेब, मला बेळगाव खूप आवडतं. सुंदर शहर आहे. रजेत आम्ही हटकून बेळगावला जातो. कॅम्पमधून फिरतो, जुन्या आठवणीने भारावून जातो".

तो खूपच इमोशनल होत होता. बराच वेळ बोलत राहिला. मी नंतर विचारल, "आम्ही आता वर चाललो आहोत तर वर कांही भिती वगैरे नाहीना? "

तो तात्काळ म्हणाला, "कांही नाही, आणि आम्ही आहोतच ना ईथे. "

माझा जीव भांड्यात पडला. तिथे आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली, माझ्या साथिदारांनाही जेंव्हा त्याने ओळखपत्र विचारले तेंव्हा दोघांनी आपापले आय. डी. कार्ड दाखविले. ते पाहून मात्र मला खूप हायसे वाटले. यांच्याकडे सरकारी ओळखपत्रे आहेत याचा अर्थ

हे इथले नागरिकच असावेत. चौकशीअंती समजले की शासनाने येथे सर्व स्थानिकांना अशी ओळखपत्रे दिलेली आहेत.

वर जाताच दिसलेले दृश्य पाहून मी थक्क झालो. सबंध गुलमर्ग पूर्णपणे बर्फाछादित होते. कुठेही जमीन किंवा गवतसुद्धा दिसत नव्हते. पांढऱ्याशुभ्र दूधसागरातून चालत आहोत असे वाटायचे. आणखी नवल म्हणजे एवढ्या बर्फवृष्टीमध्येही गंडोला चालू होता. माझ्या दोघा मित्रांनीही तिकीटाचे पैसे दिले आणि आम्ही भल्या मोठ्या ट्रॉलीतून शेवटच्या टोकापर्यंत पोचलो. गुडघाभर मुलायम बर्फातून चालताना खूप मजा आली. आम्ही भरपूर फोटो काढले. आम्हाला तिथे सांगण्यात आले की तेथून पंधरा किलोमिटरवर पाकीस्तानची सीमा आहे.

संध्याकाळी हॉटेलवर पोचलो तेंव्हा मला हलके हलके वाटत होते. चहा घेता घेता मी गियासुद्दिनला विचारले. " तुम्ही इथे कांही व्यवसाय करत आहात की नोकरी शोधत आहात. "

तेंव्हा उत्तरादाखल त्यांनी आपली व्यथाच बोलून दाखविली. हे सारे त्यांना आज सांगायचेच होते.

गियासुद्दिन हा सुलतान बेकरीमध्ये काम करत होता तर अझीज हा एका फर्नीचर कम्पनीमध्ये सुताराचे काम करीत होता. मुळचे ते दोघेही कलकत्त्याजवळच्या खेड्यातले. म्हणजे मुस्लिम असले तरी ते कश्मीरी नव्हते. नोकरीनिमित्त बिहार उत्तरप्रदेश येथे छोटी मोठी कामे करीत असता एका मित्राने त्याना श्रीनगरला आणले. वास्तवीक बिहार व उत्तर प्रदेश इथे त्यांना सांगण्यात आले होते की तुम्ही मुम्बईला जा, तिथे वाट्टेल तितके काम मिळेल. पण सुदैवाने त्यांना इथेच चांगले काम मिळाले होते.

पण त्यानी लगेच आपली व्यथा बोलून दाखवली. ते म्हणाले, " आता आम्हाला इथे रहावेसे वाटत नाही. अतिरेकी कारवायाने आम्हीच नव्हे तर इथले मुस्लिम तरूणही हैराण झाले आहेत. घूसखोरी करून इथे आलेले कट्टर अतिरेकी इथल्या तरूणांना पळवून नेतात, पैशाचे आमिष दाखवून त्यांना अतिरेकी कारवाया करायला लावतात. पोलीसांनाही समजत नाही, कारण महम्मद, हुस्सेन, शेख अशी नावे बऱ्याच लोकांची असतात. संशय आला की अशा नावाच्या मिळतील तितक्या तरूणांना पकडून, चांगली मारहाण करून त्यांच्याकडून ते वदवून घेतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये घबराट पसरलेली असते. कधी आणि कुठे काय होईल सांगता येत

नाही. वरचेवर बॉम्बस्फोट, धरपकड, 144 कलम किंवा' बंद'. समाजकंटकांचेही इथे फावते" ते दोघे अत्यंत पोटतिडिकेने हे सर्व सांगत होते.

आपण मुस्लिम असल्याचे मला सांगायलाही त्यांना प्रथम लाज वाटली. म्हणून नमाज पढायला ते आळीपाळीने गपचूप जात होते.

या सम्भाषणातून त्यानाही समाधान झाले आणि मला त्यांची व्यथा ऐकून खूप दया आली. रात्र झाली होती, मी आग्रहाने त्यांना माझ्याच हॉटेलमध्ये जेवण दिले, माझे नाव, पत्ता, फोन नम्बर देऊन मुम्बईला येण्याचे आग्रहाचे आमंत्रण दिले. केंव्हाही या, मी तुमच्या नोकरीसाठी जातीने प्रयत्न करीन असे आश्वासनही दिले. त्यानी केलेल्या मदतीबद्दल मी मनापासून त्यांचे खूप आभार मानले. त्यांना खूप बरे वाटले. ते मुस्लीम असूनही मी त्यांच्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल त्यानी माझे खूप कौतुक केले. दुसऱ्या दिवशी जबरदस्त थंडी पडलेली असता दोघे पुन: सहा वाजता मला निरोप देण्यासाठी आले. बस स्थानकापर्यंत ते आले, त्यांच्या ओळखीच्या सुमो ड्रायव्हरला त्यानी मला सुखरूप जम्मूला न्यायला सांगितले. साश्रू नयनांने मी त्याना प्रेमभरे आलिंगन देऊन त्यांचा निरोप घेतला. त्यांच्याच विचाराने त्यांच्याच आठवणीने मी माझ्या परतीच्या प्रवासात भारावून गेलो. पण एका जगावेगळया प्रवासाने आणि अनपेक्षित अनुभवाने अंतर्बाह्य आनंदीत झालो. नंदनवनाची दुसरी बाजू पाहून अंतर्मूखही झालो.



# दार्जिलिंग प्रसन्न

पहिला चंदरखणीचा ट्रेक युथ हॉस्टेल मार्फत केल्यापासून मला हिमालयाच्या ट्रेकचे व्यसनच लागले. पटवर्धन आणि गंगावणे यांच्याबरोबर केलेल्या त्या ट्रेकमध्ये आम्ही तिघांनी धमाल मजा केली होती. पहिला उत्साह होता. तेरा चौदा हजार फुटापर्यंत चढाई करून बर्फात खेळण्यात ट्रेकचे सार्थक झाले असे वाटले होते. नंतर नोकरीनिमित्त पुण्याला आल्यानंतर पुन: नवा उत्साह संचारला होता. बेळगावला आमचा एक ग्रुप असायचा. तेथे छोटे मोठे हायकिंग केले होते. ते दिवस नवलाईचे होते. नंतर सांगलीच्या वालचंदला असताना महाबळेश्वर, वासोटा असे ऊंचावरचे ट्रेक करताना बरीच दमछाक झाली होती.. पण पुढे हिमालयातले ट्रेक म्हणजे तर निसर्गसानिध्य, साहस आणि प्रवास यांचा त्रिवेणी संगमच होता.

एक मात्र खरे की मला प्रत्येक गावी सुदैवाने चांगले मित्र भेटले. कॉलेजमधला नरजींदर म्हणजे तर सळसळते तारुण्य आणि प्रसन्न सहवास. नोकरीमुळे आता जरी वेगळे झालो असलो तरी ट्रेकच्या निमित्ताने भेटायचोच. आताही तसेच झाले. मी फोन लावला.

“हॅलो, नरजी, सगळं ठीक आहे का”?

“हो, सबकुछ ठीक, कशी काय आठवण झाली”?

“जेंव्हा ट्रेकिंगबद्दलची बातमी समजते तेंव्हा पहिली याद तुझी, बाकीचे नंतर. ”

“बोल जायचं कधी आणि कुठे, आणि यायचं कधी तेही सांग. ”

असा हा नरजी. त्याला सांगितलं, “ पुण्याच्या “ युवासाहस” या संस्थेने दार्जिलिंग – संदकफू हा ट्रेक आयोजित केला आहे, तुला जमेल का ते सांग. ”

तो एका पायावर तयार तर झालाच पण सर्व तयारीनिशी पुण्यात वेळेवर हजरही झाला. हॅवरसॅक, जॅकेट्स आणि संस्थेच्या कॅप्स वगैरे सोपस्कार करून आम्ही पुण्याच्या स्टेशनवर

एक्स्प्रेस्स पकडली. प्लॅटफॉर्मवर पस्तीस चाळीस ट्रेकर्सचा ग्रुप पाहिला आणि तेंव्हाच वाटलं की आज आपल्या झोपेचे खोबरे होणार. निम्मी संख्या तर शाळा कॉलेजच्या मुलामुलींचीच होती. वीस तीसच्या वयातले आम्ही पाचसहा जणच दिसत होतो. बाकीची तर सारी प्रौढ मंडळीच होती. अर्थात मनाने तरूणच. सारे कसे मोठ्या उत्साहात. एकमेकांच्या ओळखी करून घेण्यात सारे दंग होते.

गाडीने वेग घेताच पत्त्यांचे डाव, गाण्याच्या भेंड्या, जोक्स, नॉनस्टॉप गप्पा आणि गोंधळ एकदमच सुरू झाला. शिवाय प्रत्येकाने बांधून आणलेला खाऊ एकमेकांना देऊन सतत चरणही चालूच ठेवलं. अखेर रात्री दमदाटी करून सर्वांना झोपायला लावलं.

हावडा स्टेशनवर गाडी बदलून लगेच दार्जिलिंग एक्स्प्रेस्स पकडली आणि सकाळ उजाडताच न्यूजलपायगुडीला उतरलो. हवा चांगलीच थंड होती आणि तशात झोम्बणारे वारे. सगळयांना गरज होती ती गरमागरम चहाची. चहा आणि ब्रेकफास्ट केल्यानंतरच प्रवासाचा शीण गेला. सारे पुढच्या प्रवासासाठी आतूर झाले होते. आमची बस अजून यायचीच होती म्हणून चौफेर फिरून पाय मोकळे केले. भोवतालचा निसर्ग पाहूनच आमची तबीयत खूष झाली. ऊंच ऊंच देवदार, सुरू, फर, पाइंसचे वृक्ष, , हिरवीगार वनश्री, सारा डोंगराळ परिसरच दिमाखदार. हिमालयाची वृक्षवल्लीच आगळी वेगळी, डौलदार. हवाही थंडगार असल्याने नवा उत्साह संचारलेला.

बस येताच मात्र सीट पकडण्यासाठी एकच घाई झाली. माझ्यासाठी नरजीने सीटही पकडलेली होती पण आमचा ग्रूपलीडर तिथे जाऊन बसल्याने माझी पंचाईत झाली. मी इतरत्र जाऊन बसलो. ओळखीचे सारे एकमेकांशेजारी जाऊन बसले आणि माझ्या शेजारची एकमेव सीट रिकामीच राहिली.

तेवढ्यात घाईघाईने आपली पर्स आणि बॅग साम्भाळत एक तरूणी आली आणि माझ्या शेजारच्याच सीटवर बसली. मी लागलीच अंग चोरून तिला जागा करून दिली. पुन: तिची बॅग वर ठेवण्यास ताडकन उठलो, ती थॅन्क्स म्हणाली.

पुन: अदबीने मी म्हणालो, " विंडो सीट हवी असेल तर बसा हं, मी इथे साइड सीटवर बसेन. " ) वा, काय स्त्रीदाक्षिण्य )

” थॅन्क्स, मला चहा घ्यायला उशीर झाला. तोपर्यंत ही बस लागली. ” तिने खुलासा केला. पुढे तासभर आमच्या गप्पा ट्रेकच्या कार्यक्रमावरच झाल्या.

रस्ता पूर्ण घाटाचा आणि वळणावळणाचा असल्याने नकळत आम्हाला एकमेकांचे चांगलेच धक्के बसत होते. तिच्या कोमल आणि लुसलुशीत स्पर्शाने माझ्या रोमरोमात एक वेगळाच उत्साह संचारला होता. मी कधी नव्हे तो इतका बोलत सुटलो होतो. मला चांगले विनोदही सुचले. आम्ही बोललो ते विषय, आमची मते, आमचे विचार, भावना सारे कांही एकमेकांना पटत होते. आमच्या सम्भाषणामुळे मुक्काम कधी आला ते समजलेही नाही. एकंदरीत आमची वेव्हलेंग्थ चांगलीच जुळते असे वाटू लागले.

दार्जिलिंगला एक दिवसाचा मुक्काम होता. मार्गदर्शन, वेळापत्रक, धोक्याच्या सूचना, बरोबर घ्यावयाचे सामान इत्यादी गोष्टींवर चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी आम्हाला बसने मणीभंजन या पायथ्याच्या गावी जायचे होते. पुन: माझ्याशेजारी तीच तरूणी. या खेपेस मात्र ती जाणूनबुजून माझ्याशेजारी स्थानापन्न झाली. स्मितहास्य करून तिने गुड मॉर्निंग म्हटलं. माझ्या दृष्टीने ती खरोखरच सुप्रभात होती. मनात विचार केला हीच संधी आहे पूर्ण परिचय करून घेण्याची व वाढविण्याचीही.

“ तुम्ही नाव नाही सांगितलत. ” मी न राहवून विचारलं.

“ तुम्ही विचारलं नाही. ” चांगल उत्तर मिळालं.

“ आता विचारतो समजा. “ मलाही थोडासा धीटपणा यायला लागला.

“ केतकी. ”

“मला वाटलच. “

“कशावरून?”

“ तुम्ही येताच तसा सुगंध आला आम्हाला. ”

“कांहीतरीच काय. ”

यानंतर मात्र आमची गाडी सम्भाषणाच्या पर्फेक्ट ट्रॅकवर आली. तिच्या हसऱ्या चेहऱ्याने माझी सकाळ फुलून गेली. वाटलं या ट्रेकमध्ये आपण हवेतच तरंगत राहणार. मनात

विचार आला, मागच्या तीन चार ट्रेकमध्ये ही परी भेटली असती तर. ( तर काय आपण दार्जीलिंगला आलोच नसतो. )

मणीभंजनला आम्ही तासभर थाम्बणार होतो. चढाई करण्याची पूर्ण तयारी करायची होती. सर्वांनी रेनकोट, बिस्कीटे, वेफर्स, ग्लुकोज, पाण्याच्या बाटल्या, चॉकोलेट्स, लिमलेट्सच्या गोळ्या ई. खरेदी केली. आमचा मधल्या वयोगटाचा जो सात आठ जणांचा ग्रुप होता त्यात अर्थात केतकी माझ्याबरोबरच होती. आमची जवळिक पाहून नरजी आपला दुसऱ्या मित्रांबरोबर फिरायचा. मधून मधून तो मला कांहीतरी खुणवायचा. पण मी जाणूनबुजून नजर चोरायचो. मी आणि केतकी आम्ही दोघांनी निळया रंगाचे प्लॅस्टिकचे रेनकोट घेतले. एकत्रच मग टपरीवर चहा घेतला. केतकीचा हा पहिलाच ट्रेक असल्याने ती माझ्याकडून व नरजीकडूंन आवर्जून सर्व माहिती घेत होती. मधूनच तिला भीती वाटायची

“मला जमेल काहो हा ट्रेक.?” दोन चार वेळा तिने केलेला हा प्रश्न.

“ जमायला काय त्यात. पायाखालचा रस्ता, पाऊलवाट बघत चालत रहायचे. वर डोंगराच्या शिखराकडे पहायचे नाही. तहान भूक लागली किंवा थकवा जाणवला की थाम्बायचं आणि ग्लूकोजचं पाणी प्यायचं. वेळ भरपूर असतो. तेंव्हा घाई गडबड करायची नाही. ” माझा प्रामाणिक सल्ला.

तिची तक्रार, “ चालायची सवयच नाही हो अलीकडे. शिवाय या ट्रेकमध्ये परतही फिरता येत नाही ना. तेही विचारलं मी. शिवाय नुसतेच चालायचे नाही, पाठीवर हे इतके ओझे घेऊन. ”

मी, “ कांही घाबरू नका, फक्त पहिल्या दिवशी थोडा त्रास होतो. त्यानंतर पायांना सवय होऊन जाते. शिवाय थंड हवा, सुंदर निसर्ग यामुळे थकवा नाहीसा होतो. आणि सोबतीला इतकी दोस्तमंडळी आहेत. ट्रेकचा उद्देशच तो असतो. त्यानंतरही तुम्हाला चालवले नाहीच तर मी आहे ना, उचलून घ्यायला. ”

आता मात्र ती लाजली, विरमली. पण तिने माझ्याकडे असा कांही कटाक्ष टाकला की --- “ “ हम तो हो गये घायल “.

पहिला ट्रेक केवळ सात किलोमिटरचा असल्याने आम्ही दहा हजार फुटावरच्या तमलिंग या मुक्कामाला साडेचार वाजताच पोहोचलो. गरमागरम भजी व मगभरून चहा मिळाल्याने सगळेच खूष. गप्पा रंगल्या, कांही नवख्या ट्रेकर्सना थोडा त्रास झाला होता. ते पायाला बाम वगैरे लावून गुपचुप पडून राहिले. रात्रीच्या जेवणावर मात्र सर्वांनी चांगलाच ताव मारला नी कॅम्पफायर भोवती सगळे आतुरतेने जमले. जॅकेट, मफलर, पुलओव्हर, स्वेटर्स, शाल ई. वापरून थंडीपासून बचाव करण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न सुरू होता. एकमेकांना आग्रह करून करून गाणी सूरू झाली. पहिल्यांदाच ट्रेकिंगला आलेले, सभाधीटपणा नसलेले सुध्दा सहभागी होऊ लागले. हळुहळू रंग चढला. सर्वांचे लक्ष नरजीकडे होते. सरदारजी नक्की गाणार हे माहित होते.

सर्वांनी एकच गलका केला, “ नरजी, एक पंजाबी गाणे पाहिजे “

नरजी अशा आमंत्रणाची वाटच पाहत होता.

“ संयोनी “ म्हणून त्याने जी पंजाबी धून पकडली तिने तर सारा जल्लोशच सुरू झाला. त्या कडेकपारीत आमचा आवाज घुमला. त्याच्याबरोबर सर्वांनीच ताल धरला आणि सारा आसंमत संगीतमय झाला. अपूर्व मैफल. आणि तेवढ्यात गरमागरम बोर्नव्हीटा बसल्या ठिकाणी सगळयांना मिळाला. एका वेगळया नशेतच सारे पांगले. प्रत्येकजण “ संयोनी “ गुणगुणतच टेंटमध्ये शिरला.

दूसऱ्या दिवशीचा ट्रेक घनदाट जंगलातून होता. पायवाटेच्या एका बाजूस प्रचंड उतार व दरी तर दुसरीकडे ऊंचच ऊंच डोंगर व दाट झाडी. तशातच आम्ही मार्गस्थ व्हायच्या वेळेसच पावसाची रिपरिप सुरू झाली. सर्वांचे रंगीबेरंगी रेनकोट निमुळत्या पायवाटेवरून दबकत दबकत चालू लागले. विहंगम दृश्य. विविध रंगांच्या फुलांची माळच जणू. सगळे कसे एका लयीत चालत होते.

माझं मन मला जे सुचवतं होतं तेच नेमकं केतकीलाही सुचलं. तिने सर्व मुलींना पुढे जाऊ दिलं व ती स्वत: मागे राहिली. रेनकोटच्या आवरणात कोणी कुणाला ओळखू शकत नव्हते हे तिने पाहिले व ती सहजपणे माझ्याजवळून पुढे चालू लागली. पावसाचा जोर वाढतच होता. थंडी व वारा याने सगळे हैराण झाले होते. कांही मुली तर ठार रडवेल्या झाल्या होत्या. त्यातच आणखी एक संकट उभे ठाकले. सकाळची वेळ असल्याने मोठमोठे याक त्याच पायवाटेने समोरून

आमच्या विरुद्ध दिशेने जायचे. धिप्पाड काळे याक म्हणजे साक्षात यमधर्मच. त्यांना पाहूनच भीती वाटायची.

एका निमूळत्या पायवाटेने जाताना आमच्या गप्पा रंगल्या होत्या. पावसाने चेहरे ओले झाले होते आणि डोळयावरून पाणी निथळत होते. त्यात पुन: पावसामुळे हवेत दाट धुक्यासारखी हवा पसरलेली.. अचानक एका वळणावर समोरून एक मोठा याक धावतच आला. केतकी किंचाळतच मला येऊन बिलगली. तिच्या ओरडण्याने याक बिचारा बाजूने सटकला. पण मी मात्र केतकीच्या बाहुपाशात अडकलो. मी त्या याकाला धन्यवाद देत केतकीचा हात घट्ट धरून ठेवला. मागे पुढे कुणीच दृष्टीपथात नव्हते म्हणून बरे झाले. मी मनात विचार केला, आणखी दोन चार याक आले असते तरी चालले असते.

त्या संध्याकाळचा कॅम्पफायरचा कार्यक्रम अविस्मरणीयच झाला. केतकीने तर धमालच केली. तिने गाण्याच्या भेंड्याच्या चढाओढीत जोषपूर्ण ग़ाणी सादर करून सर्वांना थक्क करून सोडले. तिच्या तोडीस तोड अशी मीही नरजीबरोबर गाणी म्हंटली आणि सगळयांच्या नजरा आम्हा दोघांवर रोखल्या गेल्या. काही चलाख मुलींनी खाणाखुणा केल्या खऱ्या पण केतकीच्या ते कांही लक्षात आले नाही. एक बरे झाले. त्या सर्व मुलींनी केतकीला एखाद्या हिरॉईनसारखे आपल्या घोळक्यात सामावून घेतले. आणि इकडे मी रात्रभर टेंटमध्ये तारे शोधत राहिलो. नरजीच्याही ते लक्षात आले आणि त्यानेतर त्याच्या चेष्टेला आळा घालता घालता मला पुरेपुरे झाले. एकूण या ट्रेकची गम्मतच न्यारी होती.

ट्रेकमधली शेवटची ऊंची आम्ही गाठली ती संदकफूला, बारा हजार फुटावर. तिथली ती प्रसन्न सकाळ हा आमच्या ट्रेकचा परमोच्च बिंदू ठरला. हिमालयातल्या स्नोलाइनची ऊंची गाठण्याचा ट्रेकचा उद्देश सफल झाल्याने सर्वांना शांत झोप लागली. त्यामुळे संदकफूच्या गेस्टहाऊसमध्ये सगळे ताजे तवाने होऊनच जागे झाले. आतापर्यंत पाऊस आणि धुक्याला तोंड देत वाट सम्पविल्यामुळे ही स्वच्छ सूर्यप्रकाशाने उजळलेली सकाळ सगळया ट्रेकर्सना नवचैतन्य देऊन गेली. कुणी फोटो सेशन सुरू केले, कुणी पत्त्यांचा डाव मांडला आणि बऱ्याच लोकांनी अधाशिपणे कॅन्टीन गाठले. बहुतेकांनी ब्रेड आम्लेटवरच ताव मारला. कारण नेहमीचे कॅम्पचे जेवण हे शाकाहारीच होते.

आम्ही पाच सहा जणांनी मात्र रमीचा डाव मांडला. बहुतेक मुली वेणीफणी करून आणि ठेवणीतला पोषाख चढवून मिरवू लागल्या. त्यातलीच आमची केतकी एक. आकर्षक कमीज सलवार आणि वर रंगिबेरंगी दुपट्टा असा पेहराव करून ती रिंगमास्टरसारखी ईकडे तिकडे फिरत

होती. आणि नंतर कांहीतरी निमित्त काढून आमच्या घोळक्यात माझ्या शेजारी येऊन बसली. म्हणूनच आमची भेट कुणाच्या नजरेत भरली नाही.

कांचनगंगा, मकालु आणि लोत्शेसारखी सत्तावीस अट्ठाविस हजार फुटावरची बर्फाच्छादित शिखरे स्वच्छ सुर्यप्रकाशात झळाळत होती, अद्‌भूत नजारा. दूर क्षितीजावरचा हा नयनरम्य देखावा आम्ही सर्वांनी डोळ्यात साठवून ठेवण्याचा प्रयत्न केला. क्षणाक्षणाला आकाशातले आणि पर्वतशिखरावरचे रंग बदलत होते. कांहीनी तर मोठ्या झूम लेंन्सने त्या शिखरांना कॅमेऱ्यात बंदिस्त केले. अशा सुंदर पार्श्वभूमीवर केतकी दोन मैत्रीणींना घेवून उभी ठाकली. तिने आपला कॅमेरा माझ्याकडे सुपूर्द केला आणि अगदी लाडात विनंती केली,

“ प्लीज, आमचा एक ग्रुप फोटो काढा ना. “

त्या चौघी पाचजणी पोज घेण्यात रमल्या. केस नीट नेटके करणे, दुपट्टा आडवा उभा करणे, तू इकडे, मी मध्ये, हात खांद्यावर असू दे, असे बरे दिसते का यातच बराच वेळ गेला आणि मी हातात कॅमेरा घेऊन उभाच. मी वैतागलो, “ लवकर आटपा, दिवस मावळेल इथेच”.

नाहीतरी. “ आंधळा मागतो एक डोळा” या उक्तीनुसार मला आनंदाच्या उकळयाच फुटल्या होत्या. गेल्या चार दिवसात पावसामुळे आणि ट्रेकींगमुळे मला केतकीचा एकही फोटो माझ्या कॅमेऱ्यात पकडता आला नव्हता. आणि आता ही नामी संधी चालून आली होती. मी केतकीचे बरेच फोटो, अर्थात तिच्या मैत्रीणीसोबत काढले. केतकी इतकी खुष झाली की आम्हा सर्वांना तिने कॅन्टीनमध्येच नेले. अत्यंत कुशलतेने तिने माझ्या शेजारची खुर्ची बळकावली आणि आमच्या गप्पा भन्नाट रंगल्या. ती प्रसन्न सकाळ चिरस्मरणीय झाली. टेबलाखालून माझ्या पायाशी चाळे करताना केतकी हळूच मिश्किल हसायची. तिने चांगलाच आक्रमकपणा सुरू केला होता.

पुढे दोन दिवसानंतर आम्ही रिम्बिकचा शेवटचा मुक्काम गाठला आणि ट्रेकची समाप्ती झाली. तिथून आम्हाला न्यूजलपायगुडीला बसने जायचे होते. वाटेत आम्ही चहापानासाठी मिरिक लेक जवळ थाम्बलो. दार्जिलिंगच्या ट्रेकर्सचे हे एक श्रमपरिहाराचे निसर्गरम्य स्थळ आहे. वेळ सकाळची असल्याने लेकवर भरपूर दाट धुक्याचे आवरण होते. पाणी तर राहोच जमीनसुध्दा दिसत नव्हती. दहा फुटावरचे कुणी कुणाला दिसत नव्हते. त्यामुळे बरेच जण काठावरच उभे राहिले. पण आम्हा दोघांना ही चांगलीच सूवर्णसंधी होती.

केतकी माझ्या पाठोपाठच सावधपणे पावले टाकत होती. बिंनधास्तपणे तिने माझा हात पकडला आणि मला बिलगूनच ती चालू लागली. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. मला सिलसिला सिनेमातले बागेतले गाणे आठवले -" ये कंहां आगये हम –" खरोखर अती रोमांचकारी प्रसंग ! थंडीने ती कुडकुडत असल्याने मी माझे जॅकेट तिच्या खांद्यावर अलगदपणे पांघरले. नजरेनेच तिने पसंती दर्शवली व मला जास्तच बिलगून चालू लागली. तिने हळूच माझ्या खांद्यावर डोके टेकले. स्वर्गीय आनंदात आम्ही आकण्ठ बुडून गेलो. क्षणभर वाटले हे धुके असेच रहावे आणि हा प्रवास इथेच सम्पावा. नाही तरी आमचा ट्रेक सम्पलेलाच होता. पण परत जाण्याची सर्वांनाच घाई होती. आता उरली ती टाटातूट.

न्यूजलपायगुडीहून हावड्याचा प्रवास रात्रीचा होता. त्यात पुन: वेगवेगळया बोगीमध्ये सीट्स आलेले, नरजी तर पूरा वैतागला. सकाळी आम्ही मुम्बईला जाणारी ट्रेन पकडायला स्टेशनवर आलो.

नरजी म्हणाला, " हे अस वेगवेगळया बोगीत बसणं नाही जमणार बुवा. मी आता एक टी सी शोधतो आणि पाहतो कांही जमते का. "

अखेर नरजीने शोधून एक सरदारजी टी सीच पकडला व काम तमाम केले. बरीच खटपट करून आमची तीन तिकीटे अपग्रेड करून ए. सी. बोगीत घेतली. मग काय दिवसाचा आमचा प्रवास म्हणजे धमालच. नरजीने केतकीला तर भंडावून सोडलेच पण माझीही जबरदस्त फिरकी घेतली. इतरांच्या बोगी दूरवर असल्याने आम्ही तीघेच फलाटावर फिरायचो, फळे खा, भजी खा, कॉफी प्या, मिळेल तो जूस घ्या असे करत तरंगतच राहिलो. मोठी जमेची बाजू म्हणजे मी काढलेले केतकीचे फोटो. कोणतेही टेंशन किंवा काळजी नसल्याने तिच्या सुंदर चेहऱ्यावर एक विलक्षण प्रसन्नता दिसत होती. मला आठवले, एका पेट्रोलपम्पावर मी एक घोषवाक्य वाचले होते " सम् टाईम्स जर्नी इट्सेल्फ बिकम्स डेस्टिनशन". ) Sometimes journey itself becomes the destination " ) खरेच होते ते. असाच आमचा मजेदार प्रवास झाला. मुक्कामाला पोहचायची अजिबात घाई नव्हती.

मुम्बईहून मात्र नरजी आम्हाला बेस्ट ऑफ लक सांगून तसाच बडोद्याला घरी गेला आणि आम्ही बसने पुण्याला पोचलो. स्वारगेटवरच आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. येणाऱ्या

शनिवारी डेक्कनवर भेटण्याचे पक्के झाले. केतकीला हवे होते ते तिचे व दार्जीलिंगच्या परीसराचे फोटो.

शनिवारी ठरल्यावेळी बरोबर ती आली. विशेष पोशाखात ती खूपच स्मार्ट आणि गोरीपान दिसत होती. पक्की पुणेकर. ट्रेकमधल्या तिच्या अवतारापेक्षा हे सौंदर्य कांही औरच होते. क्षणभर मी थक्कच झालो. 'वैशाली'त कॉफी घेता घेता आम्ही फोटोंचा आस्वाद तर घेतलाच पण एकमेकांचा राहून गेलेला परिचय सुद्धा करून घेतला. म्हणजे अगदी व्यवहारिक पातळीवर जाऊन. आम्हा दोघांमध्ये कोणता संकोचच नव्हता. नंतर निघताना मात्र तिने आश्चर्याचा धक्काच दिला. म्हणाली, " उद्या तुम्हाला खास आमंत्रण आहे. माझ्या मम्मीला तुम्हाला भेटायचे आहे. " मी चरकलोच. सावरून बसलो.

"कांही भलतं सलतं सांगितलं नाहीना घरी?" माझा केविलवाणा सवाल. " हो, उद्या समजेलच ना" तिने तोऱ्यातच फर्मान सोडले. त्यावेळीतर तिचा चेहरा खूपच सुंदर वाटला. चेहऱ्यावरच्या भावना क्षणात बदलण्यात मुली पटाईत असतात वाटते.

जरा अडखळतच मी विचारलं, "म्हणजे पप्पा आणि मम्मी माझी प्रकट मुलाखत घेणार ना की झडती घेणार? बापरे! चांगलीच तयारी करावी लागेल. "

" छे छे तसं कांही नाही. आणि घाबरता कशाला एवढे? पप्पा नसतीलच घरी, पण मम्मी मात्र तुमची परीक्षा घेईल. अभ्यास करून या. "

तिने सांगितलेल्या पत्त्यावर मी बरोबर वेळेत पोहोचलो. केतकीचे घर म्हणजे छान टुमदार बंगलाच होता. नमस्कार चमत्कार झाल्यावर मम्मी चहा करण्यास आत गेल्या आणि केतकीने मला घर दाखविले. खूप सुंदर सजावट होती. स्पेशल इंटीरिअर.

केतकीच्या आईने व्हॉलंटरी रिटायरमेंट घेतलेली होती. त्या बॅंकेत सिनियर मॅनेजर होत्या. देखण्या आणि सोशल वाटल्या. मला पाहून् आणि माझ्याशी बोलून त्याना बरे वाटले असावे असा माझा अंदाज. आम्ही चहा घेत असताच केतकीचे पप्पा आले. माझी जरा धांदलच उडाली. पुन: नमस्कार, हॅन्ड्शेक आणि ओळख. केतकीने अर्थात याआधीच माझ्याबद्दल भरपूर कांही पॉझिटिव्ह सांगून मम्मी पप्पाचे मन जिंकून घेतलेले दिसले. मी निरोप घेऊन बाहेरच्या हॉलमध्ये येताच केतकी घाई घाईने पण प्रसन्न मुद्रेने बाहेर येऊन माझे दोन्ही हात हातात घेतले

आणि ग्रीन सिग्नल दाखविल्याप्रमाणे डोळे मिचकावले. सगळा हिमालय माझ्या पाठीशी उभा आहे असेच मला वाटले.

परीक्षा व मुलाखत देऊन प्रथम क्रमांकाचा निकाल घेऊनच मी बाहेर पडलो. मनाशी म्हटले " दार्जिलिंग प्रसन्न".



# क्लास

रविवारला जोडून सलग तीन दिवस सुट्टी आली होती. मुम्बईची सारी नोकरशाही खुष. त्यातले अर्धे अधिक चाकरमाने तरी सहलीनिमित्त मुम्बईबाहेर पडले असणार. आम्ही दहा बारा प्राध्यापक मन्डळी पण त्यापैकीच. आम्ही निवडले होते माथेरान. आमच्यातल्या एका तरूणाने सुचवले होते की नेरळपासून चालतच माथेरानला जाऊ. पण एकानेही ते कानावर घेतले नाही आणि टॅक्सीने अर्ध्या तासातच आम्ही माथेरानच्या माथ्यावर पोचलो होतो.

दोनतीन पॉईंट पाहूनच सगळे थकले. आणि स्टेशनजवळच्या पार्कमध्ये एका मोठ्या झाडाखाली हिरव्यागार गवतावर आरामात बसले. इतका निवांत वेळ मिळाल्यावर मग गप्पांना काय तोटा. कॉलेज, मॅनेजमेंट, विद्यार्थी करता करता क्लासेसवर विषय येऊन ठेपला. मला ऐकून आश्चर्य वाटले की माझ्याशिवाय इतर सर्वजण कोणत्या ना कोणत्या क्लासम्ध्ये जात होते. पण कुठेही वाच्यता नाही.

मी जवळच बसलेल्या जोशी सरांना विचारलं, “ सर तुम्ही कोणत्या क्लासला जाता.?”

“ मी घराजवळच्याच गणेश क्लासला जातो. लोकल पकडण्याचा त्रास नाही. ”

“ हे क्लासवाले पेमेंट चांगलं देतात काहो?” मी महत्वाच्या मुद्द्यालाच हात घातला.

“ मोठे ए सी क्लासवाले देतात चांगला मोबदला पण कांही खवचट असतात. ”

“ म्हणजे?”

“ गेल्या वर्षी मी दादरच्या करनवट क्लासमध्ये जात होतो. एकदा टॉपिक सम्पल्यामुळे मी वीस मिनिटे आधिच क्लास सोडला. तर त्या पठ्ठ्याने पेमेंट देताना अर्ध्या तासाचे पैसे कापून घेतले. दुसऱ्याच दिवशी मी तो क्लास सोडला. ” जोशीसाहेबांनी अंदरकी बात सांगितली.

जोशींच बोलणं ऐकून शेजारीच बसलेले साने म्हणाले, " बरोबर आहे पण आपण अशा क्लासेसचे उम्बरठे चढायचेच नाहीत. याउलट कांही क्लासेस असेही आहेत की जिथे शिकवणे म्हणजे प्रेस्टीजची बाब असते. "

" ते कांहीही असो मुम्बईत जगायचे तर असा साईड इनकम मिळवायलाच पाहिजे. " सोनावणेनी महत्वाचा मुद्दा मांडला व तो सर्वांनी उचलून धरला.

"कोचिंग क्लास झिंदाबाद " सर्वांनीच आवाज उठवला अणि एकच हशा पिकला.

सहलीहून आल्यानंतर माझ्या डोक्यात सारखे क्लासचेच विचार थैमान घालू लागले. दुसऱ्याच दिवसापासून मी क्लास शोधू लागलो. कारण मला समजून चुकले की ही सीनीयर मंडळीसुध्दा जर का क्लासेसमध्ये शिकवित असतील तर मलाही नक्कीच जायला पाहिजे.

मुम्बापूरीत रहायचे, पैसा कमवायचा, चांगल्या संसाराची स्वप्ने पहायची, भविष्य उज्वल करायचे तर एकाच नोकरीवर समाधान मानणे परवडण्यासारखे नाहीच. एक जीव सदाशीव अशी माझी परिस्थिती असली तरी एकट्याचा खर्च भागवून, घरी थोडे पैसे पाठवून पुढच्या वाटचालीसाठी बॅंकेत शिल्लक टाकणे हीच मोठी कसरत वाटायची. कॉलेजची चाकरी चारपाच तास करून मला शिल्लक वेळही भरपूर मिळत होता. म्हणून विचार पक्का केला आणि योग्य क्लासमध्ये फावल्या वेळेत शिकविणे जमते का हे पाहू लागलो. मुम्बईत तसा क्लासेसना तोटाच नाही.

शोधता शोधता एक चांगला क्लास मिळाला, पण तो चुनाभट्टीला. पाहू म्हंटलं. अनुभव तरी येईल. त्या भागात मिश्रा सरांचा हा क्लास खूपच लोकप्रीय होता. बोर्डात आणि विद्यापीठात विद्यार्थी चांगल्या टक्केवारीने उत्तीर्ण व्हायचे. मिश्रा सर स्वत: मॅथ्स आणि फिजिक्स घ्यायचे. हुशार आणि दिलदार माणूस. पण तितकाच काटेकोर शिस्तीचा. विद्यार्थी आणि शिक्षक दोघांचीही आचारसंहिता त्यांनी केली होती. सर्व वर्ग वातानुकुलित आणि विद्यार्थीही चांगले स्पर्धक. आम्हाला मानधनही चांगले मिळायचे. त्यामुळे शिकवायला फार उत्साह वाटायचा. कामाचं रूपांतर करमणूकीत व्हायच. मी तर खूष होतो. कॉलेजपेक्षा इथलं वातावरण बरचं वेगळं. मला खरा आनंद मिळायचा तो हुशार मुलांचे आव्हान स्वीकारण्याचा. खूप रमायचो मी. त्यांना आणखी हुशार करण्यात मला धन्यता वाटे. तास कसा सम्पायचा ते समजायचेच नाही. श्रमाचे चीज झाल्याचे एक विलक्षण समाधान, तृप्तता.

सारे कांही बरे होते पण माझी मोठी समस्या म्हणजे लोकलचा प्रवास. कुर्ल्यापर्यंत फास्ट लोकलने व पुढे चुनाभट्टीपर्यंत स्लो हार्बरने जायचे. गर्दी तशी डोम्बिवलीकरांच्या पाचवीलाच पूजलेली. प्रत्यक्ष कामापेक्षा येजा करण्यातच शक्तीचा अपव्यय. विचार केला की अनुभव कांही घरात बसून मिळत नसतो पाहू. जमते तोवर करू. नाहीतरी शरीराला थोडा व्यायाम पाहिजेच.

क्लासच्या ऑफिसमध्ये वेगवेगळया सरांच्या वेळा, विषय, उपलब्ध वर्ग इत्यादी पाहून अचूक वेळापत्रक बनवायचे काम करण्यासाठी मिश्रा सरांनी अलिकडेच एका हुशार आणि चुणचुणीत मुलीची नेमणूक केली होती. ती म्हणे त्यांच्या मित्राचीच कन्या. ती तशी पदवीधर होतीच पण स्मार्ट आणि सुंदरही होती. ती प्रत्येक प्राध्यापकाच्या गरजा पाहून तासिका ठरवायची. चांगल्या दर्जेदार व हुकुमी नोट्ससाठीही मिश्रा क्लास प्रसिद्ध होता. प्रत्येक वर्गाच्या आणि विविध विषयांच्या नोट्सचे पॅकेज तयार करण्याचे कामही ती चपलतेने करायची. चौकशीअंती तिचं नाव अंजली आहे असे समजले.

क्लास सम्पवून मी स्टेशनकडे निघालो की मला धास्तिच वाटायची. परतीचा लोकल प्रवास म्हणजे माझ्यासाठी मोठी सर्कसच होती. एकदा विचार आला अंजलीला सांगून क्लासची वेळ तरी बदलून घ्यावी म्हणजे लवकर निघता यईल. अंजली माझं ऐकेल याची मला पुरेपूर खात्री होती कारण दोन दिवसापूर्वीच मी तिला एका मोठ्या संकटातून बाहेर काढले होते. माझ्या दृष्टीने ती अभिमानाचीच गोष्ट होती. पण अंजलीवर मोठे संकट होते.

तो एक गमतीचाच प्रकार झाला. दांडेकर सरांनी त्या दिवशी येणार नसल्याचे सांगितले होते. वर्ग होता स्पर्धापरीक्षेला बसणाऱ्या हुशार मुलांचा. पण आदल्या दिवशी त्या वर्गाला तसे सांगायला अंजली विसरली होती. त्यामुळे सुमारे सत्तर ऐंशी विद्यार्थी सरांची वाट पहात वर्गात बसून होते. तास सुरू व्हायला फक्त दहा मिनिटे होती. आणि यातले मिश्रा सरांना काहीच माहित नव्हते. पण ते केबिनमध्ये नव्हते हे बरे झाले. अंजली घाबरलेल्या आणि भाम्बावलेल्या अवस्थेत फेऱ्या मारित होती. काय करावे हे समजतच नव्हते. मुले तर गोंधळ घालणारच पण मिश्रा सरांचा पारा चढला तर तिच्या नोकरीवरच गदा यायची.

मी हे सर्व पाहिले आणि अंजलीला बाजूला घेऊन धीर दिला. “ घाबरू नकोस, काय करायचे ते पाहू, पण मला सांग की मी हा तास घेतला तर चालेल का “.

ती म्हणाली, “ सर, पण तुम्ही काय शिकविणार? या वर्गाचे विषयच वेगळे आहेत. ”

मी म्हंटलं, “ स्पर्धा परिक्षेचं इंग्लिश मी सहज शिकवीन. मला माहित आहे त्याच स्टॅन्डर्ड आणि सिलॅबस. तू पहा मुले कशी खुष होतील ते. ”

तिने क्षणभर विचार केला व म्हणाली, ” काहीही करा पण त्या मुलांना तासभर एंगेज करा, कारण बरीच मुलं फार दुरून येतात, कांही नाही शिकवलं तरी चालेल, मात्र मिश्रा सराना सांगू नका, प्लीज.”

माझ्या अपेक्षेप्रमाणे त्या तासाला चमत्कारच झाला. नवीन् वर्ग नवीन आणि स्मार्ट विद्यार्थी. मी थोड्याशा वेगळ्या पद्धतीने हाताळणी केली. माझा नवीन चेहरा बघून मुले शांत बसली होती. त्यांना पहायचे होते की ही कोण आसामी आहे आणि आता नवीन काय शिकविणार.

“ मेरे पास चॉक है, मेरे पास डस्टर है, मेरे पास बोर्ड है, मेरे पास दिमाग है, कबूल? तो आपके पास क्या है? “ सिनेमाच्या ढंगातल्या या प्रसिद्ध डायलॉगने मुले अफलातून खुष झाली, एकच हशा पिकला. उत्तर द्यायचेच विसरून गेली. हा काही वेगळाच मामला आहे म्हणून लक्ष देऊन ऐकू लागली. आणि हळू हळू मी त्याना इंग्लिश व्याकरणातल्या गमती जमती सांगून तासभर खिळवून ठेवले. माझे ठरलेले काही व्याकरणाचे क्लिष्ट प्रश्न मी विचारले. हुशार विद्यार्थीही गोंधळले. वर्गात तशी खूप शांतता होती. मधूनमधून डोकावणारी अंजलीही थक्क झाली. मी वर्गातून निघताना मुलांनी गलकाच केला, “ सर, उद्या पुन: या आमच्या वर्गावर. ”

त्यानंतरच्याच दिवशी पुन: एक संकट अंजलीसमोर उभे. इंग्रजी वृत्तपत्रात एक जाहिरात द्यायची होती, मिश्रा सरांनी अंजलीलाच त्या जाहिरातीचा मजकूर तयार करायला सांगितले होते. तिला वेळ तर नव्हताच तरी लिहायला बसली खरी पण योग्य शब्दच सुचत नव्हते. जास्त विचार न करता ती सरळ माझ्याकडे आली. मला वर्गातून बाहेर बोलावून तिने आपली अडचण सांगितली. तास सम्पताच ऑफिसमध्ये बसून मी आकर्षक भाषेत जाहिरात लिहून दिली. माझे आभार मानून मोठ्या तोऱ्यात ती मिश्रा सरांच्या केबिनमध्ये शिरली.

माझे प्रसंगावधान पाहून तिला नक्कीच वाटले असणार की या माणसावर विसम्बून रहायला कांहीच हरकत नाही. संकटकाळी कृष्णासारखा धावून येतो.

त्या दिवशी स्टेशनकडे जाताना ती आपण होऊन माझ्याबरोबरच निघाली. पुन: माझे तिने भरपूर कौतुक केले आणि आभारही मानले. मी मात्र चांगलाच भाव खाल्ला. एकदाची माझी

अडचण सांगण्याची संधी मिळाली. स्टेशंनकडे जाताना मी विषय काढण्याचे ठरविले होतेच. इकडचे तिकडचे बोलताना जाणवले की ती फार सोशल तर होतीच पण मनमोकळेपणाने बोलते. शिवाय दिसायला तर खूपच सुंदर, कारण मी तिला फार जवळून पहात होतो. इतका रेखीव चेहरा मी कुठे पाहिलाच नव्हता. शिवाय बोलण मधाळ आणि आवाज मधूर.

ती म्हणाली, " सर, मुलं तुमच्याबद्दल खूप सांगतात हो. "

मी, " म्हणजे, चांगले की वाईट? "

ती, " अहो सर, मिश्रा क्लासमध्ये तुम्ही खूप लवकर लोकप्रीय झालात. तुमचं शिकवणं त्यांना खूप आवडतं शिवाय बोर होत नाही म्हणतात. "

माझ्याबद्दल मुलांचच काय पण अंजलीचसुद्धा मत चांगल आहे हे एकून बरे वाटले. मी पण मग तिची स्तुती केली. आमच्या मग खूप गप्पा रंगल्या. हळूच मी माझी अडचण सांगितली. तिने ताबडतोब माझी सूचना मान्य केली. तिच्याबरोबर बोलत असता मला तिचं व्यक्तिमत्व चांगलच भावलं. ती खरोखरच गोड होती, सुंदर तर होतीच पण हुशार आणि प्रसन्न होती. त्यादिवशी मला गाडीतली गर्दी जाणवलीच नाही. तिचाच चेहरा दिसत होता. तरी बरे मी डोम्बिवली स्टेशनवरच उतरलो. रात्रीतर बरीच स्वप्नं पाहिली. परिणामी कॉलेजपेक्षा क्लासला जाण्याची ओढ वाढू लागली.

दुसऱ्याच दिवशी " गंगेत घोडं न्हालं " असेच मला वाटले. क्लासनंतर मी निघताना मला थाम्बायला सांगून अंजली माझ्याबरोबरच निघाली. एक गोड छानशी मुलगी आपल्याबरोबर यायला आपणहून तयार होते यापेक्षा मोठे भाग्य ते कोणते. मी असा तरंगतच स्टेशंनपर्यंत गेलो. ती खूप बोलत राहिली. सरांचे, मुलांचे व इतरही बरेच किस्से तिने सांगितले. शेवटी मात्र तिने एक महत्वाची आणि आनंदाची बातमी दिली.

" सर, आपल्या दोघांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मिश्रा सरांनीच आज सांगितली. आम्ही लवकरच ठाण्याला आमच्या क्लासची शाखा ओपन करणार आहोत. तिथे मला ते ऑफिस इंनचार्ज म्हणून नेमणार आहेत. तुमच्याप्रमाणे मलाही लोकलचा प्रचंड त्रास होतो हे मी सरांना वरचेवर सांगितले होते. त्यावरचाच जणू हा उपाय त्यानी शोधून काढला. "

तिला मधेच थाम्बवून मी विचारले, " आणि माझे काय?"

" सर, तुमचाच प्रश्न मी आधी मांडला होता. विषय पाहून दोघा तिघांना तरी ते ठाण्याला पाठवणार आहेत. ठाण्याला म्हणजे क्लासला हो. तुमचा नम्बर तर मी आधीच लावला आहे". तिने तेवढ्यात विनोद केला.

इतक्यात स्टेशन आले आणि ती फर्स्टक्लास डब्याच्या दिशेने निघून गेली. त्याच क्षणी मला एक झकास् कल्पना सुचली, आपणही फर्स्टक्लासचा पास काढू. म्हणजे तिलाही आपल्याबरोबर घेता यईल.

लगेच दुसऱ्या दिवशी मी फर्स्टक्लासचा पास काढून घेतला. या नाटकाच्या पहिल्या अंकात आमचा परिचय मात्र चांगला झाला. एकूण आमचे सूर ताल जुळतात असे वाटू लागले. फर्स्ट क्लासमधून आमचा प्रवास मजेत सुरू झाला. तिच्या सुगंधी सहवासात लोकलचा प्रवास मला खूपच आनंददायी वाटू लागला.

कांही दिवसाने मी ऑफिसमध्ये गेलो असता समजले की अंजली ठाण्याच्या नवीन क्लासमध्ये गेली आहे. मला राग आला आणि वाईटही वाटले. मला न सांगताच ती कशी काय गेली. म्हणजे आता ती ठाण्याला आणि मी चुनाभट्टीला, " मधु तिथे अन चंद्र ईथे, झुरतो अंधारात" असेच झाले. ही परिस्थिती बरेच दिवस अशीच राहिली. अंजू माझ्यासाठी काही प्रयत्न करते की नाही हेही समजेना आणि तिची भेटही होईना. तेल गेले आणि तूपही गेले असे वाटू लागले.

शिकविण्यात माझे मनच लागेना. ती चुकून कधीतरी येईल या आशेने माझ्या ऑफिसच्या चकरा वाढल्या. पूर्वी कधी मी असा क्लासच्या ऑफिसमध्ये कामाशिवाय गेलोच नव्हतो. त्यामुळे कुणाला शंका येऊ नये असेही वाटायचे. एकदा वाटायचे जाऊ सोडून हा क्लासच. दुसरा पाहू सोयीस्कर. पण एक मन म्हणायचे ' तिथे कुठे अशी अंजू भेटणार आहे. '

आणि लवकरच ती एकदाची प्रकट झाली. मला समजले की ती माझा क्लास सम्पण्याचीच वाट पाहते आहे. वा काय सुखद धक्का. मला प्रत्यक्ष भेटूनच आनंदाची बातमी सांगण्यासाठीच ती आली होती. त्यामुळे अगदी खुषीत तिने सांगितले की येत्या एक तारखेपासून मीही ठाण्याच्या क्लासला जायचे. शेवटी एकदाचे "गंगेत घोडं न्हालं " म्हणायची वेळ आली.

माझे ठाण्याला क्लास सुरू झाले. रोजच अंजू भेटू लागली, पण ती काउंटरच्या पलीकडे नी मी अलीकडे. नवीन ऑफिस व नवीन क्लास असल्याने अंजू एकटीच सारे ऑफिस

साम्भाळायची. मग तिला मदत म्हणून मीही हातभार लावायचो आणि नकळत तिचा हात हातात धरून ठेवायचो.

अनेक गोष्टींवरून हे सिद्ध झाले की मी तिला खूपच आवडतो. म्हणजे माझा सहवास, माझ्याशी बोलणे तिला मनापासून आवडते. पण ती नुसती मैत्री आहे की प्रेम हे कळणे कठीण होते. कांहीही असो तिचा सहवास मला अत्यंत प्रीय होता. आणि त्यामुळे लोकलचा खडतर प्रवासही डोम्बिवलीकर असूनही सुखकारक वाटू लागला. लोकल अशीच जगाच्या अंतापर्यंत जात रहावी असे वाटायचे.

एकदा मी अंजूला मदत करीत असता मिश्रा सरच तिथे आले. मी थोडासा चपापलो. तरी बरे अंजूचा हात माझ्या हातात नव्हता. मी स्टूलवर उभा राहून शेल्फवर नोट्सचे गठ्ठे लावीत होतो. त्याना बरे वाटले.

ते मला म्हणाले, " थॅन्क्स बरं का सर, आणखी कांही दिवस थोडा त्रास सहन करावा लागेल. इथल्या क्लासला एक शिपाई द्यायचं माझ्या लक्षात आहे. तुम्ही आपण होऊन मदत करताहात हे चांगलं कोऑपरेशन आहे. नवीन क्लास असल्याने थोड्या अडचणी आहेत. "

" आताच शिपायाची वगैरे तशी कांही जरज नाही सर, मला क्लासला दहा मिनिटं वेळ होता, म्हंटलं मॅडमना मदत करू. " मी माझ्या परीने सफाई दिली. पण क्लास सुटल्यानंतर अंजू माझ्यावर भलतीच भडकली.

कुलुप लावता लावता मला वेडावून दाखवत ओरडलीच, " गरज नाही –काय? वा, सरांपुढे कसे नरम झालात हो, आणि भाव खाऊन मोकळे. मी आपली इथे धडपडते आठ तास."

रागावल्यानंतर तर ती खूपच छान दिसत होती. गालावर लाली चढलेली. मी सावरून घेतच तिला म्हणालो,

"अगं तुझ्यापुढेही मी नरमच असतो ना. सरांना आपल्याबद्दल कांही गैर वाटू नये म्हणून मी तोंडदेखलं काहीतरी म्हणालो. तुलाच मी साम्भाळून घेत होतो. तुझ्याबद्दल त्यांना कांही संशय यायला नको. पण तू का एव्हढं मनावर घेतेस. चल आपण तलावपाळीवर जाऊ, तुला भेळ आवडते ना, आणि आईसक्रीम पण खाऊ. पारा जरा खाली येईल. " मी सारवासारव करायची म्हणून म्हणालो.

आईसक्रीम म्हंटल्याबरोबर खराच पारा उतरला. मग लाडात येऊन म्हणाली, " हो खरंच, सर, बरेच दिवस झाले मी तलावपाळीवरही गेले नाही आणि आईसक्रीमही खाल्ले नाही. चला एक दिवस उशीरा घरी जाऊ, तेवढीच गाडीला गर्दीही कमी होईल. "

" घरी तुला रागावतात का गं उशीर झाला तर?" मी विषय बदलायचा म्हणून विचारलं.

" काहो, इतका वेळ लाडीगोडी लावली आणि आता फिरकी घेता का माझी?" तिचा हा हजरजबाबीपणा.

" नाही बुवा, पुन: आता रागावशील, आपण आता भेळच खाऊ. " अशी आमची कधी कधी जुगलबंदी व्हायची. पण तिच्याशी असा गोड वाद घालायलाही मजा यायची.

त्यादिवशी आम्ही भेळ खात असता कांही मुले आमच्याकडे पाहून मिष्किलपणे हसत गेली. बहुतेक क्लासचीच मुले असावीत. आम्हा दोघांनाही चोरट्यासारखे वाटले. तेंव्हापासून कानाला खडा लावला, पुन: म्हणून ठाण्यात असे एकत्र फिरायचे नाही. भेटायचे नाही.

मग कुठे भेटायचे? अंजूलाही हाच प्रश्न पडला.

यावरच आम्ही पुढे पंधरा दिवस फावल्या वेळात क्लासमध्ये बसून चर्चा केली. माझा पहिला तास असला तर मी त्याआधी तासभर क्लासवर जाऊन बसायचो आणि शेवटचा तास असला तर अंजूला घेऊनच बाहेर पडायचो, तेही सर्व विद्यार्थी गेल्यावर. त्यामुळे अशा चोरट्या भेटीत आम्हाला खूप मजा वाटायची. एकमेकाबद्दलचे आकर्षण प्रकर्षाने जाणवायचे. क्लासपासून स्टेशन जवळच होते, गप्पा खूप रंगल्या की वाटायचे स्टेशन दूर असते तर बरे झाले असते.

लोकापवादाचा ब्रम्हराक्षस शिक्षकांच्या पाठीशीच असतो. त्याचे एखादे पाऊल वाकडे (संशयीतांच्या नजरेतून ) पडले तर साचेबद्ध आरोप तयारच, " शिक्षकच असे वागतात तर मुलांचे काय?"

पण माझ्या बाबतीत एक बरे होते की अंजू माझी विद्यार्थिनी नव्हती. तरी मिश्रा सरांना संशय आला असता तर अंजूच्या नोकरीवरच गदा यायची.

एकदा परत जाताना अशाच विचाराने अंजू शांत शांत होती. तिला खुलविण्यासाठी मी एक क्लुप्ती काढली. मी सुचविलं, “ आपण ठाणे, डोम्बिवली सोडून दूर कुठेतरी सुट्टीच्या दिवशी फिरायला जाऊ”. तिलाही ते पटले.

कॅलेंडर पाहून आणि क्लासच्या सुट्ट्या पाहून मी एक दिवस निवडला. आदल्या दिवशी क्लास बंद करताना मी विषय काढला.

“अंजू मॅडम, उद्या सुट्टी आहे तेंव्हा आपण बाहेर जाणार आहोत. चांगला पोषाख परिधान करून सकाळी सहा वाजता स्टेशनवर या. ”

“ कुठे जायचे आपल्याला? “

“ ते उद्याच समजेल. ”

तिने संशयीत नजरेने माझ्याकडे पाहिले आणि विचारले, “ मला कुठे पळवून न्यायचा तर विचार नाही ना?”

“हा गरीब प्राणी तुला काय पळवून नेणार. एखाद्या बिर्ला –अम्बानीचा मुलगा असतो तर नक्कीच पळवून नेलं असतं. आणि पळवून नेणारा काय असं सांगून विचारून पळवतो?. ”

रविवारची प्रसन्न सकाळ. स्टेशन पूर्ण रिकामे. मी फस्टक्लासच्या डब्याकडे जात असताच अंजू दिसली. तिच्याकडे पाहून मी चकीतच झालो. सुंदर साडी नेसलेली, वेणीवर एक छानसे गुलाब खोवलेले, नक्षीदार अशी पर्स खांद्याला लटकवलेली अशी तिची आकर्षक छबी बघून मी थक्कच झालो. तिचा चेहरा पाहून तर मला एखाद्या कसलेल्या कलाकाराच्या कुंचल्यातून प्रकट झालेले पोर्ट्रेटच आहे किंवा एखाद्या मासिकाच्या दिवाळी अंकावरचे आकर्षक मुखप्रुष्ठच आहे असा भास झाला. क्लासच्या ऑफिसमध्ये पटापट कामे उरकणारी, फोनवरून पालकांचे शंका निरसन करणारी, हसत हसत मुलींशी चेष्टामस्करी करणारी आणि प्राध्यापकांशी अदबीने वागणारी हीच का ती अंजली असा क्षणभर मला प्रश्न पडला.

मी वाकून मुजरा करीत म्हणालो, ” गुड मॉर्निंग मॅडम, अशी नटून थटून राजकन्या कुठे निघाली बरे?”

“ चेष्टा नको हं, आपण कुठे निघालो आहोत ते सांगा आधी. मी मैत्रीणीकडे चालले आहे असे घरी सांगितले आहे. संध्याकाळी परत यायचे ना?”

“ पाहू, सरप्राईज़ केंव्हाही गुप्तच असावं लागतं. ”

व्हीटीला उतरून् आम्ही टॅक्सीने गेटवे ऑफ ईंडीयाला पोचलो. एक नवी कोरी बोट धक्क्याला लागलेलीच होती. मी चटकन बोटीत चढून मागे वळून पाहिले तर अंजू तशीच उब्भी. ती पाण्याला घाबरत असावी असे वाटून मी तिचा हात धरून तिला आत घेतले. आम्हाला पुढच्या बाजूला चांगली जागाही मिळाली. अंजूने पुन: काळजीच्या सुरात विचारले, --

“अहो स, सांगा ना कुठे चाललो आहोत आपण.?”

प्रथम मी तिच्या कानात हळूच सांगितले, ” मला प्लीज सर म्हणू नको. लोकांना वाटेल टीचर्ने आपल्या स्टूडंटलाच पळवून आणले आहे. ”

जास्त ताणण्यात अर्थ नाही कारण अंजूचे टेंशन वाढत जाईल. म्हणून तिला मी सांगितलं, --“

“आपण चाललो आहोत घारापुरी बेटावर. ”

“तिथे काय आहे?” “

“ तिथेच त्या प्रसिध्द एलिफंटा केवज आहेत. तासाभरात तुला दिसेलच ते. ”

“एलिफंटाच्या त्रिमूर्ती ना?. त्यालाच घारापुरी म्हणतात का? मी शाळेत असताना सहल निघाली होती. पण वर्गणी जास्त असल्याने मी जाऊ शकले नव्हते. ” अंजूने आठवून सांगितले.

सीबर्डस बोटीभोवती घिरट्या घालीत होते. आणि इकडे अंजू पाण्यात हात घालून खेळत होती. तिला खूप गम्मत वाटत होती. तेंव्हा ती किती बालीश आणि निरागस दिसत होती. तो चेहरा एक अप्रतीम सौंदर्याचा नमूनाच होता. तो मी कॅमेऱ्यात टिपायला विसरलो नाही.

तिथे पोचल्यानंतर शक्य तितक्या लवकर परत जायचे ठरवून आम्ही घाई घाईने त्रिमूर्तीच्या गुहेकडेच गेलो. त्या मूर्तींची भव्यता आणि प्रमाणबध्दता पाहून आम्ही थक्क झालो.

कलेचं सौंदर्य ग्रहण करण्यासाठी ह्रुदयात रसीकता व संवेदनशीलता असावी लागते, व ती अंजलीच्या मनात आहे हे मला जाणवले. मूकपणाने तिने वेगवेगळया बाजूने खालून वरपर्यंत ती मूर्ती न्याहाळली. तिचे पुढचे वाक्य ऐकून तर मी थक्कच झालो. तिचे अवलोकन असे होते.

" मी परवाच रा. श्री. जोग यांचं " सौंदर्यशोध आणि आनंदबोध" हे पुस्तक वाचले होते. त्यात ते म्हणतात की एखाद्या कलाकृतीला आकर्षकपणा यायचा असेल तर " सुंदर, चित्र आणि भव्य " यापैकी एकतरी गुण असावा लागतो. मला तर वाटते की या मूर्तीत या तिन्ही गुणांचा संगम झालेला दिसतो. म्हणून ती खूप आकर्षक दिसते. "

"बापरे !! अंजू तू तर नुसती रसिक नसून चांगली समीक्षकही आहेस हं. मला वाटलं नव्हतं तुझा एवढा अभ्यास असेल असं"

" अभ्यास वगैरे नाही हो, वाचन आहे. "

मी तिला मग विचारलं, " मग आग्र्याचा ताजमहल, अमेरिकेची स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आणि पॅरिसचा आयफेल टॉवर याच कॅटेगरीत येतात का?"

" हो, नक्कीच. इतकच काय नायगारा आणि गिरसप्पाचा धबधबाही याच माळेतले आहेत. "

अशीच आमची कलेवर बरीच चर्चा झाली. मलाही साहित्य आणि संगीत खूप आवडत असल्याने मी मनात म्हणालो की ही आपल्याला चांगली सहचारिणी शोभून दिसेल.

सगळा परिसर पाहून आम्ही पुन: त्रिमूर्तीकडे आलो व एक बेंचवर शांतपणे बसलो. नंतर तिने माझ्या आईवडिलांबद्दल विचारले आणि स्वत:बद्दलही सांगितले. आमचा एकमेकांवरचा विश्वास वाढला. मनमोकळेपणा आला. तेव्हा तिने घरचा विषय काढला. तिने सांगितले की परवा तिच्या घरी तिच्या लग्नासंदर्भात जोरदार चर्चा चालू होती. तिच्या पप्पांनी वधुवरसूचक मंडळातून तीन चार स्थळे फोटोसकट आणली होती. पहिल्यांदाच तिच्यासमोर ही चर्चा होत होती. तिच्या पप्पांना ते रिटायर होण्यापूर्वी निदान अंजलीचे तरी लग्न करायचे होते. तिच्या पाठचीही एक बहीण आहे असे अंजलीच्या बोलण्यावरून समजले.

मी तिला चिडविण्यासाठी विचारले, " मग तू काय सांगितले पप्पांना. तुला एखादा फोटो पसंत पडला का? "

" तुमचा फोटो नव्हता ना माझ्याकडे." तिचा हजरजबाब. नकळत तिने मला पसंत केल्याचे सुचविले.

मग मी सरळ विषयालाच हात घातला. मी तिचा हात हातात घेऊन तिला म्हणालो, " इथे ब्रम्हा, विष्णु आणि महेश हे तिन्ही देव आहेत यांच्या साक्षीने आपण आजच पुढचा मार्ग ठरवूया का?" यावर ती लगेच म्हणाली, " तुम्ही कांहीतरी ठरवाल म्हणून मी केंव्हाची वाट पहाते आहे. "

मला एकदम एक मार्ग सुचला. मी तिला म्हणालो, " आमच्या घरीही तेच चालले आहे. पप्पाना पत्रिका पहायची असते. मी त्याना कळवतो की मी इथे एक स्थळ पाहिलेले आहे, तुम्ही दोघे आलात तर आपण विचार करू. तुम्हाला हे स्थळ नक्कीच पसंत पडेल. त्यांचं उत्तर मी तुला कळवीन, मग आपण एकमेकांना ओळखत नाही असे नाटक करू. पहा तुझे मम्मी पप्पाही तयार होतील."

तिला हा मुद्दा खूप आवडला, आणि लगेच हालचाल करायचे आम्ही ठरविले. परत येताना दोघांनाही हलके हलके वाटत होते. मोठा प्रश्न सुटला म्हणून अंजू एकदम खुष झाली.

पुढे पाच सहा दिवसातच पहाण्याचा कार्यक्रम ठरला. रविवारचाच दिवस होता. मी, पप्पा आणि मम्मीला घेऊन अंजलीच्या घरी वेळेपूर्वीच पोचलो. मी दरवाज्यावरची बेल दाबताच अंजलीच्या वडीलांनीच दरवाजा उघडला. ते कुठे बाहेर निघाले होते असे वाटले. माझ्या पप्पांना पाहताच ते ओरडले, "

"अरे तू इकडे कसा काय? तुम्ही गावी गेला आहात असे समजले होते. बऱ्याच दिवसाने दोघे आलात. बरे वाटले. या आपण सेलेब्रेटच करू. "

थोड्याच वेळात सारा खुलासा झाला. ते दोघे बालमित्रच निघाले. इथे मुम्बईतच दोघांनी बरीच वर्षे एकत्र कामही केले होते.

पप्पांनी सरळच विचारले, " अंजली तुझीच कन्या का? मग तर प्रश्नच मिटला. तिच्या लहानपणापासूनच आम्ही तिला पाहिलेले आहे. शुभस्य शीघ्रम. बॅण्ड वाजवून टाकू. "

बराच वेळ नंतर गप्पागोष्टी झाल्या. मी आणि अंजू बाहेरच्या खोलीत एकमेकांना शुभेच्छा देत देवाचे आभार मानले.



**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com